अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक १८० I सोमवार १३ एप्रिल २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 I www.rashtrasahyadri.com



‘सहजयोग’
भाग २६

## सहजयोग आणि मानवातील सुप्त शक्ती

’सहज’ म्हणजे जे आपल्यासोबत जन्माला आले आहे. शारीरिक अवयवांच्या अस्तित्वाबाबत आपण जागरूक असतो आणि त्यांचा वापरही करतो. परंतु, मानवी शरीरात अशाही काही सूक्ष्म गोष्टी आहेत ज्यांच्याबद्दल आपण अनभिज्ञ आहोत. त्यापैकीच एक म्हणजे ’कुंडलिनी’ ही सुप्त शक्ती. भारतात संतांच्या परंपरेमुळे या शक्तीवर आणि आत्मसाक्षात्कारावर लोकांचा गाढ विश्वास आहे. याउलट, पाश्चात्य जगात वैज्ञानिक विश्लेषण आणि तर्कशास्त्रामुळे ही संकल्पना स्वीकारणे सुरुवातीला कठीण जाते.

निसर्गाने मानवाला अमिबापासून आजच्या विकसित टप्प्यापर्यंत आणण्यासाठी अफाट कष्ट घेतले आहेत. मानवाचे हे गुंतागुंतीचे व्यक्तिमत्व केवळ इतर प्राण्यांप्रमाणे जगण्यासाठी नक्कीच निर्माण केलेले नाही. जर मानवाकडे निसर्गावर नियंत्रण मिळवण्याची आणि आपल्या फायद्यासाठी त्याचा वापर करण्याची बुद्धी असेल, तर या मानवी जन्माला नक्कीच काहीतरी उच्च अर्थ असला पाहिजे. ही सुप्त कुंडलिनी शक्ती म्हणजेच त्या ईश्वरी किंवा नैसर्गिक उत्क्रांतीचा पुढचा टप्पा आहे, जो मानवाला त्याच्या अस्तित्वाच्या खऱ्या अर्थाची जाणीव करून देतो. मानवी निर्मितीचे प्रयोजन केवळ भौतिक प्रगती नसून, स्वतःतील त्या सुप्त शक्तीला ओळखून परमात्म्याशी नाते जोडणे हेच आहे.

# स्वर-शारदेचा अस्त...

## आशा भोसले यांच्या निधनाने भारतीय संगीतातील ‘आशा’ मावळली



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांचे निधन झाले. वयाच्या ९२ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. भारतरत्न आणि ’गानसम्राज्ञी’ लता मंगेशकर यांची लहान बहीण असलेल्या आशा भोसले यांना हिंदी सिनेसृष्टीची वर्सटाईल गायिका म्हणून ओळखले जायचे. तब्बल सहा दशकं त्यांनी इंडस्ट्रीत आपल्या गाण्यांना आवाज दिला. त्यांनी केवळ हिंदीतच नाहीतर, मराठी, बंगाली, गुजराती, तमिल, तेलुगुसह अनेक भाषांमध्ये गाणी गायलीत. हिंदी सिनेसृष्टीतील दिग्गज संगीतकार आरडी बर्मन, ओपी नैय्यर, सचिन देव बर्मन, लक्ष्मीकांत-प्यारेलाल यांच्यासोबत त्यांनी अनेक अजरामर गाणी गायली. ’दम मारो दम’ आणि ’ओम शांति ओम’ यांसारखी अनेक सुपरहिट गाणी आशा भोसले यांनी इंडस्ट्रीला दिली.

आशा भोसले यांचे पुत्र आनंद भोसले यांनी माध्यमांसमोर येऊन आशा ताईंच्या निधनाची बातमी साश्रू नयनांनी दिली. तसेच, आशाताईंवर उद्या (सोमवारी) सकाळी अकरा वाजल्यापासून तीन वाजेपर्यंत त्यांचं अंत्यदर्शन घेता येईल. त्यानंतर आशा भोसले यांची अंत्ययात्रा निघेल आणि सायंकाळी चार वाजता त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जातील. शिवाजी पार्क येथील स्मशानभूमीत शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.

आशा भोसले, भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वात बहुगुणी आणि दिग्गज पार्श्वगायिकांपैकी एक. त्यांनी आपल्या कारकिर्दीत हजारो गाणी गायली असून हिंदीसह मराठी, बंगाली, गुजराती, पंजाबी, तमिळ, तेलुगू अशा अनेक भाषांमध्ये आपला आवाज दिला आहे. १९५० च्या दशकात त्यांनी कारकीर्दीची सुरुवात केली आणि हळूहळू आपल्या वेगळ्या शैलीमुळे त्यांनी स्वतःचं खास स्थान निमाण केलं. ओपी नय्यर आणि आर डी बर्मन यांच्यासोबतची त्यांची जोडी विशेष गाजली.

त्यांनी क्लासिकलपासून कॅबरे, पॉप, गझल आणि रोमँटिक गाण्यांपर्यंत त्यांनी प्रत्येक प्रकारात आपली छाप पाडली. ’पिया तू अब तो आजा’, ’दम मारो दम’, ’इन आंखों की मस्ती’ यांसारखी त्यांची गाणी आजही तितकीच लोकप्रिय आहेत. आपल्या कारकीर्दीत त्यांनी अनेक राष्ट्रीय पुरस्कार आणि पद्मविभूषण सारखे सन्मान मिळवले आहेत. त्यांच्या आवाजाची जादू आणि संगीत क्षेत्रातील योगदानामुळे त्या भारतीय संगीतविश्वातील एक अजरामर व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखल्या जातात.

### भारताच्या रेनेसाँस युगाचा शेवट : राज ठाकरे



लतादीदी आणि आशाताई म्हणजे भारतीय चित्रपट संगीतातील, लिओनार्दो द विंची आणि मायकलॅन्जलो आहेत. लिओनार्दो द विंचीच्या कामाकडे बघताना त्यातलं परफेक्शन, कमालीचा आखीवरेखीवपणा, जबरदस्त ठहराव आणि एक सर्रकन जाणवणारी आध्यात्मिक अनुभूती जाणवत राहते. हे सगळं दीदींच्या गाण्यात जाणवत राहतं. सगळं कसं परफेक्ट, आदर्शवत वाटत राहतं, असे म्हणत मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी आशाताईंच्या संघर्षमय जीवनगाथा सांगत त्यांनी कर्तृत्वातून कमावलेली उंचीही आपल्या शब्दातून व्यक्त केली. आशाताईंचं जाणं म्हणजे भारताच्या रेनेसाँस युगाचा शेवटचा महत्वाचा घटक आज आपल्यातून गेला, असे राज यांनी म्हटले.

### सुरांची सुंदर बाग आज उजाड झाली

**आशाताईंचा आवाज म्हणजे संगीताचा आत्मा होता. त्यांच्या जाण्याने सुरांची सुंदर बाग आज उजाड झाली आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपला शोक व्यक्त केला. आशाताईंच्या आठवणींना उजाळा देताना फडणवीस यांनी एका रंजक प्रसंगाचा उल्लेख केला. फडणवीस म्हणाले, कार्यक्रमादरम्यान आशाताईंनी अचानक आग्रह धरला की मी गाणे गायला हवे. त्यांनी माझ्याकडून ’अभी ना जाओ छोडकर...’ हे गाणे गाऊन घेतले. एवढेच नाही, तर गाणे झाल्यावर त्या मिश्किलपणे म्हणाल्या होत्या, ’पहा, मी मुख्यमंत्र्यांना गाणं गायला लावले, त्या आशाताईंचा सहवास आता आपल्याला लाभणार नाही, ही कल्पनाच करवत नाही.**

# अशोक खरातची शक्तीपीठ महामार्ग परिसरात ११ एकर जमीन

## शिर्डी, नाशिक, पुणे पाठोपाठ सोलापुरातही जमवली माया...

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अशोक खरातच्या शिजूका, नॉडी कोण?**
अशोक खरातला शिजूका, नॉडी या नावाने अनेक फोन कॉल्स आले होते, असा दावा अंजली दमानियांनी केला आहे. सीडीआरमधील नंबर मी ट्रूकॉलरवर सर्च केले. त्यावेळी शिजूका, नॉडीचे नाव समोर आले. अशोक खरातने अनेक नंबर्सना कोडवर्ड दिले होते. त्याचाच हा प्रकार असल्याचे दमानियांनी सांगितले.

**सोलापूर:** भोंदूबाबा अशोक एकनाथ खरात याने पुणे, शिर्डी, नाशिकसह अन्य मोठ्या शहरांमध्ये कोट्यावधींची मालमत्ता खरेदी केल्याची माहिती तपासात समोर आल आहे. आता खरातने सोलापुरात देखील कोट्यावधी रुपयांची मालमत्ता खरेदी केल्याचे समोर आले आहे. उत्तर सोलापूर तालुक्यातील कळमण गावात भोंदू अशोक खरात याने कोट्यावधी रुपयांची जमीन खरेदी केली आहे. कळमण गावातील गट क्रमांक २००/१ मधील ४.४८ हेक्टर म्हणजे सुमारे ११ एकरांपेक्षा अधिक जमीन अशोक खरात यांच्या नावावर खरेदी करण्यात आली आहे.

२८ मार्च २०२४ रोजी झालेल्या या व्यवहाराची किंमत तब्बल २ कोटी ४० लाख ९१ हजार २०० रुपये इतकी असल्याची नोंद खरेदीखतात आहे. या व्यवहारात अशोक खरातची पत्नी कल्पना अशोक खरात हिला कुलमुखत्यार म्हणून अधिकार देण्यात आलेले असल्याचेही खरेदी खतात नमूद आहे. विशेष म्हणजे उत्तर सोलापूर तालुक्यातील कळमण गावातून शक्तीपीठ महामार्ग जाणार आहे. प्राथमिक माहितीनुसार कळमण गावात जमिनीचे साधारण भाव हे प्रति एकर ५-६ लाख रुपये प्रति एकर आहेत. **(पान ४ वर)**

# २१ तास चर्चा...
# तरी शांतीवार्ता फिस्कटली

## पाकिस्तानची मध्यस्थी निष्फळ : अमेरिकेची शरणागतीची अट इराणने नाकारली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि इराणच्या शिष्टमंडळात पाकिस्तानमध्ये साधारण २१ तास चर्चा झाली. चर्चेनंतरही अमेरिका-इराणमधील शांती वार्ता निष्फळ झाल्यानंतर अमेरिकेचे शिष्टमंडळ चर्चा सोडून मायदेशी रवाना झाले. अमेरिकेच्या अवास्तव मागण्यांमुळे चर्चा निष्फळ ठरल्याचा दावा इराणकडून करण्यात आला आहे.

अमेरिकेने युरेनियम संवर्धन पूर्णपणे थांबवण्याची मागणी केली. इराणने देशातून सुमारे ९०० पौंड युरेनियमचा साठा काढून टाकावा, अशी अट अमेरिकेने घातली. अमेरिका होर्मुझच्या सामुद्रधुनीची सुरक्षा स्वतःच्या अटींवर व्यवस्थापित करायचा आहे. तसेच इराणने शरणगती पत्करावी, अशी अटही अमेरिकेकडून घालण्यात आली. त्यामुळे अमेरिकेच्या या अटी इराणकडून तात्काळ अमान्य करण्यात आल्या. साधारण २१ तास अमेरिका आणि इराण यांची चर्चा झाली. परंतु अखेर ही शांती वार्ता निष्फळ ठरली. कोणताही करार न करताच आम्ही अमेरिकेला परत निघालो आहोत. इराणने आमच्या अटी स्वीकारणे नाकारले आहे, असं अमेरिकेचे उपराष्ट्रपती जे.डी. व्हान्स यांनी दिली. जे.डी. व्हान्स म्हणाले. इराणसोबत चांगली चर्चा झाली. मात्र आम्ही ठोस निर्णयावर पोहोचलेलो नाही. या चर्चेतून कोणताही निष्कर्ष निघालेला नाही. आम्ही येथे प्रामाणिक हेतूने आलो होतो. परंतु इराण कराराच्या अटी स्वीकारण्यास तयार नाही, असंही जे.डी. व्हान्स यांनी सांगितले.

**■ अमेरिका आणि इराण यांच्यातील चर्चा निष्फळ ठरल्यानंतर, पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री इशाक दार यांनी एक पत्रकार परिषद घेतली. यावेळी इशाक दार यांनी सांगितले की, दोन्ही बाजूंमध्ये संवाद घडवून आणण्यासाठी आम्ही प्रयत्न केले होते. दोन्ही देशांत चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्या. आता इराण आणि अमेरिकेने शस्त्रसंधीची मुदत वाढवावी, अशी आमची विनंती आहे.**

इराण आणि अमेरिका यांच्यात इस्लामाबादमधील चर्चा निष्फळ होताच अमेरिकेने होर्मुझच्या सामुद्रधुनीत इराणने पेरलेले जलसुरंग काढण्यास **(पान ४ वर)**

# मुख्यमंत्री सहायता निधीसाठी ऑनलाईन पोर्टल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**रुग्णांना आठ तासात कळणार मदतीचा निर्णय**

**मुंबई :** मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत मोठा बदल करण्यात आला आहे. मुख्यमंत्री सहाय्यता निधीची सर्व कागदपत्रे आणि निर्णय घेण्याची प्रक्रिया आता पूर्णपणे ऑनलाइन होणार आहे. यामुळे रुग्णांना किंवा त्यांच्या नातेवाईकांना मंत्रालयातील चकरा मारण्याची गरज उरणार नाही. यापूर्वी रुग्णांना स्वतः अर्ज करावा लागायचा. आता संबंधित रुग्णालयांनाच रुग्णाची कागदपत्रे पोर्टलवर अपलोड करावी लागतील. यासाठी प्रत्येक रुग्णालयाला स्वतंत्र 'लॉगिन' आणि 'पासवर्ड' दिला जाईल, अशी माहिती समोर आली आहे. दरम्यान, अर्ज अपलोड केल्यानंतर ३ ते ८ कार्यालयीन तासांच्या आत **(पान ४ वर)**

# राष्ट्रसंत भास्करगिरी महाराजांना मातृशोक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री





**नेवासा :** तालुक्यातील श्री क्षेत्र देवगडचे महंत राष्ट्रसंत श्री भास्करगिरीजी महाराजांच्या मातोश्री सरुवाई ज्ञानदेव पेसोटे पाटील यांचे ९९ व्या वर्षी वृध्दापकाळामुळे देवगड येथे रविवारी सकाळी ६-१५ वाजण्याच्या सुमारास निधन झाले. त्यांच्या अंत्यदर्शनासाठी राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून विविध संत महंत भाविक हजारोच्या संख्येने उपस्थीत होते.

सरुबाई यांच्या निधनाचे वृत्त समजताच सकाळी-सुर्योदयापासुनच भाविकांची श्री क्षेत्र देवगड येथे अंत्यदर्शन घेण्यासाठी गर्दी झाली होती. संत महतांसह हजारो पुरुष, महीला युवक भाविकांनी अंत्यदर्शन घेतले. सायंकाळी साडेपाच च्या सुमारास मंदीर प्रांगणातून टाळ मृदुंगाच्या गजरात अंत्ययात्रेस प्रारंभ साला.

या अंत्ययात्रेत विविध गावच्या भजनी मंडळासह, संत महंत, राजकीय क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले होते प्रवरामाईकाठी अन्नपूर्णा प्रसादालयाच्या प्रांगणात ब्रम्हवृदांच्या मंत्रघोषात महंत भास्करगिरी महाराजांचे जेष्ठ बंधु मधुकर बाबा पेसोडे पाटील यांनी स्व. मातोश्रींच्या मृतदेहाला अग्नी डाग दिला.

यावेळी झालेल्या अंत्यसंस्कार समयी संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे **(पान ४ वर)**

## महत्त्वाचे..

### एका दैवी स्वराचा अंत : ना.विखे पाटील

प्रवरानगर : भारतीय संगीत क्षेत्राचा आधारस्तंभ आणि आपल्या सुरावटींनी कोट्यवधी रसिकांच्या हृदयावर अधिराज्य गाजवणाऱ्या पद्मविभूषण आणि महाराष्ट्र भूषण आशा भोसले यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत धक्कादायक आहे. शास्त्रीय संगीतापासून ते पॉप आणि लावणीपर्यंत सर्वच गायन प्रकारांत त्यांनी उमटवलेला ठसा अजरामर आहे. त्यांच्या निधनाने संगीत क्षेत्रातील एका सुवर्णयुगाचा अंत झाला आहे, अशा शब्दांत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. आपल्या शोक संदेशात ना.विखे पाटील म्हणाले की, स्वरसम्राज्ञी आशा भोसले आता आपल्यात नाहीत, यावर विश्वास बसत नाही. त्यांच्या निधनाने भारतीय संगीताचा जणू 'आशा-दीप'च विझला आहे, त्यांच्या जादूई आवाजाने संपूर्ण जगाला मंत्रमुग्ध केले होते. मराठी आणि हिंदीसह अनेक भाषांतील गाण्यांमधून त्यांनी विविधतेतून एकतेचे दर्शन घडवले. भारताच्या एकसंघ भावनेचा आवाज त्यांच्या गायकीत होता.

# बेकायदा सावकारांची वसुली प्रकरणे फेटाळून लावा

## सुप्रीम कोर्टाचे सर्व न्यायालयांना आदेश; पोलिसांना कारवाईचे निर्देश

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

२०२४ मध्ये न्यायालयाने खाजगी सावकारीविरोधात स्वतःहून याचिका दाखल करून घेतली होती. त्यावेळी केंद्र सरकारने प्रभावी कायदा आणण्याचे आश्वासन दिल्यानंतर ही याचिका निकाली काढण्यात आली होती. मात्र, त्यानंतर अनेक राज्यांमध्ये बेकायदेशीर सावकारांविरोधातील कारवाई मंदावल्याचे समोर आले.

नवी दिल्ली : बेकायदेशीर खासगी सावकारीविरोधात कठोर भूमिका घेत सर्वोच्च न्यायालयाने महत्वाचे निर्देश दिले आहेत. परवाना नसलेल्या सावकारांनी वसुलीसाठी दाखल केलेली प्रकरणे न्यायालयांनी सुरुवातीलाच फेटाळून लावावीत, तसेच अशा सावकारांविरोधात पोलिस आणि प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

राज कुमार संतोषी यांनी त्यांच्याविरोधात प्रशांत मलिकने दाखल केलेल्या चेक बाउन्स प्रकरणाला आव्हान दिले होते. संतोषी यांचा आरोप होता की, मलिक विनापरवाना सावकारी करतो आणि त्याला कर्जवसुलीसाठी फौजदारी कारवाई करण्याचा अधिकार नाही. या युक्तिवादाशी सहमत होत न्यायालयाने महत्त्वपूर्ण निरीक्षण नोंदवले. न्यायालयाने म्हटले की, विनापरवाना सावकारी करणारे अनेकदा चेक, हमीपत्र किंवा मालमत्तेची कागदपत्रे घेऊन कर्ज देतात आणि नंतर वसुलीसाठी फौजदारी खटले दाखल करून कर्जदारांवर दबाव टाकतात. अशा सावकारांना न्यायालयीन प्रक्रियेचा आधार देणे म्हणजे बेकायदेशीर व्यवसायाला अप्रत्यक्ष मान्यता देण्यासारखे आहे. न्यायालयाने पोलिस आणि प्रशासनालाही स्पष्ट निर्देश दिले आहेत की, बेकायदेशीर सावकारी प्रकरणांमध्ये **(पान ४ वर)**

# कंत्राटदारांच्या आंदोलनाला ब्रेक...

## ९००० कोटींची अतिरिक्त तरतूद, विनाअट मुदतवाढ..!

- **सातार्‍यातील बैठकीत मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे मोठे निर्णय**
- **राज्यभरातील कामबंद आंदोलन स्थगित**



**कंत्राटदारांच्या ऐतिहासिक लढ्याला मोठे यश मिळाले आहे. ९००० कोटींची अतिरिक्त तरतूद, विनाअट मुदतवाढ आणि डीएसआर सुधारणा यांसह सर्व मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामुळे राज्यभरातील कामबंद आंदोलन स्थगित करण्यात येत आहे.**

**– इंजि. समीर अमीन शेख,**
**विभागीय अध्यक्ष : राज्य अभियंता संघटना उत्तर महाराष्ट्र**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महाराष्ट्रातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कंत्राटदारांनी सुरू केलेल्या कामबंद आंदोलनाला अखेर ब्रेक लागला असून सातारा येथे झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर झाल्यानंतर राज्यभरातील आंदोलन मागे घेण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला आहे.

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या सातारा येथील निवासस्थानी झालेल्या बैठकीत कंत्राटदारांच्या प्रलंबित देयकांसह विविध मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यात आले. या बैठकीस सार्वजनिक बांधकाम खात्याचे सचिव शरद राजभोज यांच्यासह महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना व महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनाचे राज्य अध्यक्ष इंजि. मिलिंद भोसले, विभागीय अध्यक्ष अनिल पाटील, विभागीय अध्यक्ष इंजि. समीर अमीन शेख, सुरेश कडु पाटील, प्रकाश पांडव, प्रकाश पालरेचा, मंगेश आवळे, उपाध्यक्ष कांतीलाल डुबल, दिनेश कटारिया, कैलास लांडे, सिकंदर डांगे, प्रशांत भोसले, पुंजाराम पाटील, नरेंद्र भोसले आदीसह महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना व पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यातील कंत्राटदारांनी ९ मार्च रोजी कर्जत येथे झालेल्या बैठकीत ३१ मार्चपर्यंत देयके न मिळाल्यास ७ एप्रिलपासून कामबंद आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यानुसार ७ एप्रिलपासून कामे ठप्प करण्यात आली होती. मात्र शासनाने तातडीने दखल घेत बैठक बोलावली आणि त्यातून मोठे निर्णय जाहीर झाले.

बैठकीत राज्यातील प्रलंबित देयकांसाठी १९ हजार कोटींच्या बजेटव्यतिरिक्त आणखी ९ हजार कोटींची अतिरिक्त तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच सध्या सुरू असलेल्या व अपूर्ण कामांना कोणत्याही अटीशिवाय मार्च २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

याशिवाय १.५ कोटींच्या आतील कामांमध्ये ३३ टक्के सुशिक्षित बेरोजगार अभियंते आणि ३४ टक्के ओपन कंत्राटदार यांना कामे देण्याचे आदेश देण्यात येणार आहेत. विविध लेखाशिर्षकांतर्गत नवीन कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यासह बिलांचे तत्काळ वितरण करण्याचे निर्देशही देण्यात आले. गेल्या चार **(पान ४ वर)**

## संपादकीय

# आशाताई : सुरांचा उत्सव आणि अष्टपैलूत्वाचे लेणं

भारतीय चित्रपटसृष्टीच्या आणि जागतिक संगीत विश्वाच्या क्षितिजावर गेल्या आठ दशकांपासून एक स्वर निरंतर चमकतो आहे, तो म्हणजे आशा भोसले. केवळ 'गायक' म्हणून नव्हे, तर 'स्वर-जादूगार' म्हणून त्यांनी जो प्रवास केला आहे, तो विलोभनीय तर आहेच, पण त्याहूनही अधिक तो प्रेरणादायी आहे. आशा भोसले यांच्या आवाजाचे महत्त्व केवळ त्यांच्या गाण्यांच्या संख्येवरून मोजता येणार नाही, तर त्या आवाजाने मराठी, हिंदी आणि जागतिक संगीताला दिलेली नवी परिमाणे, नवीन लहेजा आणि नवनवीन प्रयोग यांतून त्यांचे मोठेपण सिद्ध होते. भारतीय संगीतातील दोन ध्रुव म्हणजे लता मंगेशकर आणि आशा भोसले. या दोन भगिनींनी सात दशके जगावर राज्य केले, परंतु आशाताईंचे वैशिष्ट्य हे की, त्यांनी स्वतःची एक स्वतंत्र, वेगळी आणि ठसठशीत ओळख निर्माण केली. आशा भोसले यांचा जीवनपट म्हणजे संघर्षातून मिळालेल्या विजयाची गाथा आहे. दीदींच्या (लता मंगेशकर) दैवी स्वरांचे वलय सर्वत्र असताना, आपल्या आवाजाला एक स्वतंत्र अस्तित्व देणे ही सोपी गोष्ट नव्हती. सुरुवातीच्या काळात त्यांच्या वाट्याला जी गाणी आली, ती बहुधा इतर गायिकांनी नाकारलेली असायची. मात्र, प्रत्येक गाण्याचे सोने करण्याची किमया आशाताईंनी साधली. त्यांनी कधीही कामाची निवड करताना संकुचित विचार केला नाही. ओ. पी. नय्यर यांच्या तालबद्ध रचना असोत किंवा आर. डी. बर्मन यांची पाश्चात्य धाटणीची गाणी असोत, आशाताईंनी प्रत्येक आव्हानाला आपल्या स्वरांच्या माधुर्याने आणि ताकदीने उत्तर दिले. आशा भोसले यांच्या आवाजाची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्यांचे 'अष्टपैलूत्व'. त्यांच्या आवाजात एक विलक्षण लवचिकता आहे. एका बाजूला 'तीसरी मंजिल' मधील उडत्या चालीची 'ओ हसीना झुलफो वाली' सारखी गाणी आहेत, तर दुसऱ्या बाजूला 'उमराव जान' मधील 'दिल चीज क्या है' सारखी काळजाचा ठाव घेणारी गझल आहे. एकाच वेळी ठसकेबाज लावणी (उदा. 'बुगडी माझी सांडली गं') आणि दुसऱ्याच वेळी एखादे शांत भावगीत किंवा शास्त्रीय संगीतावर आधारित रचना गाणे, हे केवळ आशाताईंनाच शक्य आहे. त्यांच्या आवाजात एक 'खोडकरपणा' आहे, एक 'उर्मी' आहे आणि त्याच वेळी एक 'कारुण्य' देखील आहे. मराठी चित्रपटसृष्टी आणि भावसंगीत तर आशाताईंच्या ऋणातून कधीही मुक्त होऊ शकणार नाही. बाबूजी (सुधीर फडके) आणि हृदयनाथ मंगेशकर यांच्या संगीताला आशाताईंच्या स्वरांनी एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. 'जीवनात ही घडी अशीच राहू दे' असो किंवा 'मलमली तारुण्य माझे', या गाण्यांमधील आर्जवी स्वर आजही रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवतात. आशाताईंच्या कारकिर्दीत संगीत दिग्दर्शकांचे योगदान मोठे आहे, पण त्याहून मोठे योगदान हे आशाताईंचे त्या संगीत दिग्दर्शकांच्या कल्पनेला मूर्त रूप देण्यामध्ये आहे. ओ. पी. नय्यर यांनी आशाताईंच्या आवाजातील जो 'बेस' आणि 'लय' ओळखली, ती अविस्मरणीय ठरली. आर. डी. बर्मन (पंचमदा) यांच्याशी त्यांची जोडी तर जागतिक स्तरावर गाजली. पंचमदांच्या प्रयोगशील संगीताला आशाताईंनी आपल्या आवाजाने पूर्णत्व दिले. 'दम मारो दम' पासून ते 'मेरा कुछ सामान' पर्यंतचा प्रवास हा संगीतातील एका क्रांतीचा प्रवास होता. शास्त्रीय संगीताचा भक्कम पाया असल्यामुळेच त्या पाश्चात्य पॉप किंवा जॅझ संगीत इतक्या सफाईने गाऊ शकल्या. आशा भोसले यांचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे काळानुसार स्वतःला बदलण्याची त्यांची वृत्ती. ७० च्या दशकातही त्या आघाडीवर होत्या, ९० च्या दशकात जेव्हा संगीत बदलले, तेव्हा 'रंगीला' मधील 'तन्हा तन्हा' किंवा 'रंगीला रे' गाऊन त्यांनी नव्या पिढीलाही आपलेसे केले. ७० व्या किंवा ८० व्या वर्षीही त्यांच्या आवाजातील तोच ताजेपणा आणि तीच ऊर्जा कायम होती. हे केवळ रियाजामुळे शक्य नाही, तर त्यामागे त्यांची जगण्यावरची निष्ठा आणि संगीताप्रती असलेले निस्सीम प्रेम कारणीभूत आहे. त्यांनी केवळ भारतातच नव्हे, तर जागतिक स्तरावर 'बॉई विथ लव्ह' सारख्या आंतरराष्ट्रीय कलाकारांसोबत काम करून भारतीय संगीताचा डंका वाजवला. पद्मविभूषण, दादासाहेब फाळके पुरस्कार आणि दोनदा मिळालेला राष्ट्रीय पुरस्कार, हे त्यांच्या कर्तृत्वाचे केवळ शिक्के आहेत. खरा पुरस्कार तर तो आहे, जो आजही रेडिओवर, मोबाईलवर किंवा कोणत्याही समारंभात त्यांचे गाणे वाजल्यावर लोकांच्या चेहऱ्यावर उमटतो. हजारो गाणी, डझनभर भाषा आणि कोट्यवधी चाहते ही त्यांची खरी संपत्ती आहे. त्यांनी गायलेले 'ऐ मेरे वतन के लोगों' चे काही भाग असोत किंवा 'जाऊ द्या ना घरी' सारखी लावणी, प्रत्येक गाण्यात त्यांनी आपला आत्मा ओतला आहे. आशा भोसले यांचा जीवनपट हा केवळ एका गायिकेचा प्रवास नाही, तर तो एका जिद्दी स्त्रीचा, एका महान कलाकाराचा आणि एका निरंतर शिकणाऱ्या विद्यार्थ्याचा प्रवास आहे. त्यांच्या आवाजाने आपल्याला प्रेम करायला शिकवले, दुःखात सांत्वन दिले आणि उत्सवात नाचायला लावले. भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात जेव्हा जेव्हा सुवर्ण अक्षरांनी नाव लिहिले जाईल, तेव्हा आशा भोसले हे नाव अग्रक्रमाने असेल. आजही, जेव्हा आपण त्यांचे गाणे ऐकतो, तेव्हा जाणवते की वय हे केवळ एक आकडा आहे; कला जेव्हा शुद्ध असते, तेव्हा ती काळाच्याही पलीकडे जाते. आशाताईंच्या आवाजातील तो 'नखरा', ती 'आर्तता' आणि तो 'दर्जा' भारतीय संगीताचा अनमोल ठेवा आहे. या महान गायिकेच्या योगदानाचा गौरव करणे म्हणजे संगीताच्या अधिष्ठानाचा गौरव करणे होय. आशाताईंचे स्वर हे भारतीय संस्कृतीचे अविभाज्य अंग आहेत आणि राहतील. त्यांच्या अजरामर आवाजाला आणि अलौकिक कर्तृत्वाला मानाचा मुजरा!

# ध्येय चिकाटी आणि अभ्यासू वृत्तीने जीवन यशस्वी होते : घाडगे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा फाटा :** शालेय जीवनामध्ये ध्येय चिकाटी आणि अभ्यासूवृत्ती बाळगल्यास माणसास जीवनात निश्चित यश मिळते असे गौरवोद्गार त्रिमूर्ती शिक्षण संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष ॲड. सुमती घाडगे यांनी केले.

तेलकुडगाव येथील राष्ट्रीय कबड्डी खेळाडू व त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचा विद्यार्थी गौरव मंगल बापु गटकळ याची महाराष्ट्र पुणे शहर पोलीस पदी निवड झाल्याबद्दल ग्रामस्थांच्या वतीने ठेवण्यात आलेल्या भव्य नागरी सत्कार समारंभ प्रसंगी त्या अध्यक्षीय भाषणा प्रसंगी बोलत होत्या.



यावेळी व्यासपीठावर डॉ गौरव आम्ले डॉ श्रुतीताई घाडगे/आम्ले प्राचार्य सोपान काळे, सचिन पाटेकर, मुळा कारखान्याचे संचालक मच्छिंद्र म्हस्के सरपंच सतिशराव काळे, पोपटराव काळे, आबासाहेब घाडगे, चंद्रकांत काळे, बाळासाहेब काळे ,बापू गटकळ, बंडू घोडेचोर, उपसरपंच शरद काळे, माजी सरपंच रेवन्नाथ काळे, मधुकर घाडगे, दिपक काळे, संजय घोडेचोर, बाळासाहेब गटकळ, बालकनाथ काळे, माजी सरपंच ज्ञानेश्वर काळे माजी चेअरमन सचिन गायवळे, पांडूरंग जाधव, सुरेश काळे, हनुमंत गटकळ, चंद्रकांत मस्के, मालोजी गटकळ, पोलीस पाटील शिवाजी घोडेचोर हे होते. गावातील नवतरुणांना शिक्षण क्षेत्रामध्ये प्रेरणा व त्यांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी तेलकुडगाव ग्रामस्थांकडून नेहमी शासकीय सेवेमध्ये किंवा विशेष यश संपादन करणाऱ्या व्यक्तींचा नेहमी आदर करत त्यांचा सन्मान करण्याची या गावची अनेक दिवसापासून प्रथा असल्याने ग्रामस्थांच्या वतीने गौरव याची गावातून भव्य मिरवणूक काढण्यात येऊन गौरव सह त्याचे आई-वडील आजोबा या सर्वांचा. यावेळी गावातील संतोष माने, भिमराज सातपुते, शंकर घोडेचोर, प्रसाद घोडेचोर, पृथ्वीराज गटकळ, कमलेश काळे, मेजर सिताराम गायकवाड यांनी गौरवचे स्वागत केले यावेळी तेलकुडगांव ग्रामस्थ नातेवाईक मित्र परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रामनाथ काळे यांनी केले तर आभार बीके काळे यांनी मांडले.

# संगमनेरला महात्मा फुले जयंती निमित्त भव्य शोभायात्रा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त महात्मा फुले युवा प्रतिष्ठाण, सावित्रीच्या लेकी महिला प्रतिष्ठाण, माळी समाज पंच कमिटी ट्रस्ट आणि अखिल भारतीय समता परिषद (संगमनेर तालुका) यांच्या संयुक्त विद्यमाने संगमनेर शहरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात, सनई-चौघड्यांच्या सुरात व टाळ-मृदंगाच्या निनादात ही शोभायात्रा उत्साहात पार पडली. आमदार अमोल खताळ यांनी महात्मा फुले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

महिलांच्या शिक्षणासाठी, समते साठी व शोषितांच्या हक्कांसाठी आयुष्यभर लढा देणाऱ्या महात्मा फुले यांच्या कार्याची आठवण यावेळी



उपस्थितांनी जागवली. सजवलेल्या ट्रॅक्टरमधील महात्मा फुले यांच्या पुतळ्यालाही आमदार खताळ, त्यांची पत्नी नीलम खताळ, बंधू आणि राहुल खताळ यांनी पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. ही शोभायात्रा आशीर्वाद पतसंस्थेपासून सुरू होऊन नाशिक रोड बसस्थानक, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, अशोक चौक, चावडी चौक, मेन रोड मार्गे माळीवाडा येथील महात्मा फुले पुतळ्याजवळ सांगता झाली.याशोभा यात्रेच्या अग्रभागी ढोल-ताशा पथक होते. त्यापाठोपाठ मुंबई येथील राज माता जिजाऊ लेझीम पथक, विठू माऊली महिला भजनी मंडळ पावबाकी चांदवड येथील डीजे, तसेच सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांच्या पुतळ्यांचे आकर्षक देखावे सहभागी झाले होते.,शोभा यात्रेच्या दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून संगमनेर उपविभागाचे पोलीस उपाधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांनी चोख पोलीस बंदोबस्त ठेवला होता. ई शोभायात्रा यशस्वी करण्या साठी महात्मा फुले युवा प्रतिष्ठानच्या तरुणांनी विशेष परिश्रम घेतले मिरवणूक येथील सर्व समाज बांधवांसाठी अंकुश बाळासाहेब ताजने यांच्या वतीने थंडगार पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती

## भव्य कावड मिरवणुकीने शाहापुर येथील

# काल भैरवनाथाच्या यात्रेस प्रारंभ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा फाटा** - नेवासा तालुक्यातील शाहापुर (कोलते वाडी) येथील ग्रामस्थांच ग्रामदैवत कालभैरवनाथाच्या यात्रेची गावातील मुख्य पेठेतून गंगेवरून आणलेल्या पाण्याच्या कावडीची पारंपारिक ढोल ताशाच्या गजरात भव्य मिरवणूक काढत मोठ्या उत्साहात यात्रेस प्रारंभ झाला आहे. शहापूर येथील कालभैरवनाथाचे अतिशय पुरातन मंदिर असून या ठिकाणी बोललेला नवस पूर्ण होतो अशी भाविकांमध्ये श्रद्धा असल्याने यात्रेनिमित्त परिसरासह महाराष्ट्रातून अनेक भाविक भैरवनाथाच्या दर्शनासाठी येत असतात. या यात्रेनिमित्त यात्रा कमिटी मध्ये असलेले गावचे सरपंच उपसरपंच सर्व सदस्य तसेच प्रमुख मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली यात्रेनिमित्त विविध धार्मिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे यामध्ये भव्य छबीना पालखी मिरवणूक हाजेरी त्याचबरोबर सांस्कृतिक कार्यक्रम होणार असल्याची माहिती यात्रा कमिटी व ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आली असून या कार्यक्रमांचा परिसरातील सर्व भाविक भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन ग्रामस्थांकडून करण्यात आले आहे.



# बेलापूर येथे महात्मा फुले जयंतीनिमित्त विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर :** क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त बेलापूर येथे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. क्रांतिसूर्य महात्मा फुले जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित या सोहळ्यात सामाजिक, कृषी, आध्यात्मिक, सांस्कृतिक व पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात आला.

ग्रामपंचायत, फुले जयंती समिती, समता परिषद, सावता मंडळ व एम.पी. सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने विविध उपक्रमांनी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कै. गणपत (मामा) टेकाडे मंडळ, कल्पना वाघुडे, नवनाथ कुताळ, अशोक राशिनकर, देविदास देसाई, किशोर राऊत, ऋषिकेश भागवत, रफिक बागवान, एकनाथ रोकडे व कचरू शिंदे आदींचा सन्मान करण्यात आला.

हा सन्मान संजय गांधी निराधार समितीचे



तालुकाध्यक्ष शरद नवले, पत्रकार संघाचे अध्यक्ष भास्करराव खंडागळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस अरुण नाईक, बाजार समितीचे सभापती सुधीर नवले, माजी सरपंच भरत साळुंके यांच्यासह विविध मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमास विविध संस्थांचे पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टाकळीभानला क्रांतीसुर्य महात्मा फुले जयंती उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान:** येथील ग्रामपंचायत येथे स्व. गोविंदराव आदिक सभागृह मध्ये क्रांतीसुर्य महात्मा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्व महापुरुषांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून गावातील मान्यवरांच्या हस्ते विधिवत पूजन करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त तीनही महापुरुषांना अभिवादन करण्यात येऊन समतेचा खरा आदर्श जपण्यात आला. याचे गावातील सर्वच मान्यवर पदाधिकारी व ग्रामस्थांनी कौतुक केले.



या जयंती कार्यक्रमानिमित्त माजी सभापती नानासाहेब पवार, अशोकचे माजी चेअरमन ज्ञानदेव साळुंके, सेवा संस्थेचे चेअरमन मंजाबापू थोरात, अशोकचे कारेगाव भागचे संचालक शिवाजीराव शिंदे, मार्केट कमिटीचे संचालक मयूर पटारे, माजी उपसरपंच राजेंद्र कोकणे, प्रा. कार्लस साठे, भारत भवार, विलास दाभाडे, श्रीधर गाडे, प्राचार्य जयकर मगर, भाऊसाहेब पटारे, सेवा संस्थेचे व्हा. चेअरमन अविनाश लोखंडे, प्रकाश दाभाडे, आबासाहेब रणनवरे, अनिल दाभाडे, एकनाथ पटारे, बापूसाहेब शिंदे तसेच ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खोटी पाठ थोपटणाऱ्यांना कामातून उत्तर : वैशाली वाजे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव :** शहरातील प्रलंबित पाणीपुरवठा योजनांना गती देत विकासकामे प्रत्यक्षात आणत असल्याचे सांगत पाणीपुरवठा सभापती वैशाली वाजे यांनी विरोधकांवर टीका केली. खोटी पाठ थोपटून घेणाऱ्यांना आम्ही कामातून उत्तर देत आहोत, असे त्या म्हणाल्या.

ब्रिजलाल नगर परिसरातील पाण्याच्या टाकी व पाईपलाईनची यशस्वी ाचणी शनिवारी नगराध्यक्ष पराग संधान यांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी उपनगराध्यक्ष जितेंद्र रणशूर, गटनेते प्रसाद आढाव व अन्य मान्यवर उपस्थित होते.

वाजे म्हणाल्या की, मागील चार ते साडेचार वर्षांत अनेक कामे ठप्प होती. सत्तांतरानंतर ती पुन्हा सुरू करून नागरिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न सुरू आहे. उद्घाटन करूनही उपयोगात न आलेल्या पाणी योजनांना आता प्रत्यक्ष गती दिली जात आहे.

नगराध्यक्ष पराग संधान यांनी सांगितले की, ब्रिजलाल नगर येथील पाण्याच्या टाकीमुळे ब्रिजलाल नगर, जोशी नगर, श्रद्धानगरी, शंकरनगर, माधव नगर व बोरावके वस्तीतील नागरिकांना चांगल्या दाबाने पाणी



मिळणार आहे. पुढील १५ दिवसांत फिल्टरेशन व क्लोरीनेशनसह कामे पूर्ण करून अधिक दर्जेदार पाणीपुरवठा केला जाईल.


तसेच पाच नंबर तलाव प्रकल्पातील ९५ किमी पाईपलाईनची तपासणी करून ३० एप्रिलपर्यंत ती पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, रात्रीच्या पाणीपुरवठ्याऐवजी दिवसा पाणी देण्याचा निर्णय लवकरच अमलात आणण्यात येणार असल्याने महिलांना दिलासा मिळणार आहे.

# यादवकालीन विट्ठल-रुख्मिणी मंदिरास विद्याभिनव सुभ्रमण्यभरती यांची भेट

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**


**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील यादवकालीन प्राचीन विठ्ठल-रुख्मिणी मंदिरास आंध्रप्रदेशातील अडोनी येथील शंकरनंद सरस्वती महासंस्थानचे प.पू. श्री. श्री. विद्याभिनव सुभ्रमण्यभरती महाराज यांनी भेट देऊन दर्शन घेतले. यावेळी त्यांनी मंदिराच्या इतिहासाची माहिती जाणून घेतली. मंदिर देवस्थानच्या वतीने पुजारी विजय देवळालकर व माजी चेअरमन एकनाथ पटारे यांनी महाराजांचा सत्कार केला. तसेच खोकर येथील गोरक्षनाथ देवस्थानतर्फे दिलीप काळे व बाळासाहेब कुलटे यांनीही त्यांचा सन्मान केला. यावेळी बोलताना महाराज म्हणाले की, पंढरपूर येथे जाण्याची इच्छा होती, मात्र वेळेअभावी जाता आले नाही. तथापि, टाकळीभान येथील श्री विठ्ठलाची देखणी मूर्ती पाहून ती इच्छा पूर्ण झाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. मंदिराची प्राचीनता व विठ्ठल-रुख्मिणी मूर्तीचे सौंदर्य पाहून समाधान मिळाल्याचेही त्यांनी सांगितले.या प्रसंगी दत्तात्रय बहिरट महाराज, चितळे, प्रशांत बहिरट आदी उपस्थित होते.



# महात्मा फुले भारतातील प्रबोधन युगाचे पितामह : कानडे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** जेव्हा रुढी-परंपरा व धर्मबंधनाचा औंडुबर माजवून शुद्र, अतिशुद्र, व माता भगिनीचे शोषण केले जाते, या सर्वांना शिक्षणापासुन वंचित ठेवल होत. त्या काळात महात्मा फुले यांनी कष्टकरी, शेतकरी, आणि महिला वर्गाला शिक्षणाची दारे खुली केली. त्यामुळे महात्मा फुले भारतातील प्रबोधन युगाचे पितामह असल्याचे प्रतिपादन मा. आ. लहू कानडे यांनी केले. महात्मा जोतीबा फुले जयंतीनिमित्त अभिवादन प्रसंगी ते बोलत होते. कानडे म्हणाले की, समाजातील विषमता, आणि शोषण केवळ अज्ञानामुळे होते. हे केवळ सांगितलेच नाही तर प्रत्यक्ष कृतीडरे या गरीब वर्गासाठी शाळा सुरु केल्या. सत्यशोधक कार्यकर्त्यांची फळी उभी केली, अन्यायाविरुध्द दंड थोपटणे आणि ख-या अर्थाने प्रबोधनाचे युग सुरु झाले, या वर्षापासुन महात्मा फुले यांचा द्विशताब्दी जयंती महोत्सव सुरु होते आहे. आपण सर्वांनी त्याचे विचारधन समजून घेवुन त्याचा प्रचार व प्रसार केला पाहिजे हीच सर्वात मोठी आदरांजली असेल. याप्रसंगी अशोक भोसले, सचिन जगताप, प्रद्युम्न जगताप, ए. एस. निकमसर, ॲड.रावसाहेब मोहन, सतीश बोर्डे,संदीप गुलदगड, चांगदेव देवराय, राजुमामा औताडे, दिपक कदम, तुकाराम चिंधे, हरिभाऊ बनसोडे, अंजिक्य उंडे, सुभाष मांजरे, अशोक गायकवाड, आशिष शिदे, मुख्तार शाह, सादिक मिर्झा, फैय्याज बागवान,फैय्याजभाई कुरेशी, यूनूस पटेल, शब्बीर पटेल कार्यकर्ते उपस्थीत होते.



## साईमंदिर वर्धापन दिनानिमित्त सामूहिक पारायण व दंत चिकित्सा शिबिराचे आयोजन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** येथील श्रीसाई पावन प्रतिष्ठान संचलित श्री साईबाबा मंदिराच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त बुधवार दि. १५ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता सामूहिक पारायण सोहळा आणि मोफत दंत चिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष कैलास चायल यांनी दिली.

चायल यांनी पुढे सांगितले की, श्री साई पावन प्रतिष्ठान, साई सेवा समिती आणि प्रवरा मेडिकल ट्रस्ट, ग्रामीण महाविद्यालय, लोणी व श्री साई मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राजेंद्र विखे पा. यांच्या विशेष सहकार्याने मोफत दंत चिकित्सा शिबिराचे सकाळी दहा ते दुपारी तीन या वेळेत आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात दंत तपासणी, दात साफ करणे,दात काढणे, दातात सिमेंट - चांदी भरणे,एक्स - रे, दाताची साधी कवळी,रुट कॅनल, नसेचे उपचार करण्यात येईल.गरजेनुसार आवश्यक त्या सुविधा दंत महाविद्यालय लोणी येथे देण्यात येतील.

# महामानवांचे स्मृतिस्थळे हीच आपली तीर्थक्षेत्रे : डॉ. नागेश गवळी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कुकाणा :** बहुजन समाजाच्या उद्धारासाठी कार्य करणाऱ्या महामानवांची स्मृतिस्थळे हीच आपली तीर्थक्षेत्रे असावीत, असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते डॉ. नागेश गवळी यांनी केले. ते कुकाणा (ता. नेवासा) येथे आयोजित क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त जाणता राजा ग्रुपतर्फे आयोजित कार्यगौरव पुरस्कार वितरण सोहळ्यात बोलत होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री ज्ञानेश्वर मंदिर संस्थानचे अध्यक्ष तथा माजी आमदार पांडुरंग अभंग यांनी भूषवले. प्रा. सुनील गर्जे यांनी प्रास्ताविक, तर राहुल जावळे यांनी स्वागत केले.

डॉ. गवळी पुढे म्हणाले की, महात्मा फुले यांचे शिक्षण हे चिकित्सक विचार देणारे होते. 'सत्यमेव जयते'चा संदेश देत त्यांनी समाजजागृती केली. महापुरुषांना जातीत न अडकवता त्यांच्या विचारांचा स्वीकार करणे आवश्यक आहे.

यावेळी ॲड. सुमतीताई घाडगे, पत्रकार विकास अंत्रे, अक्षय बोराडे, मतीन भोसले, विजय देशमुख, फुलचंद रोकडे, रावसाहेब मगर आदींना विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल कार्यगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

# डाकले महाविद्यालयात संविधान उद्देशिका वितरण व शपथ ग्रहण उपक्रम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर :** चंद्ररूप डाकले जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर येथे भारतीय संविधान उद्देशिका वाचन व वितरण कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आणि प्राध्यापकांनी एकत्रितपणे संविधानातील मूल्ये अंगीकारण्याची, लोकशाही, धर्मनिरपेक्षता, समाजवाद आणि न्याय या मूल्यांना अभिवादन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय कांबळे हे होते.

कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रा. डॉ. संजय कांबळे यांनी आपल्या मनोगतात संविधानाचे महत्त्व अधोरेखित करत विद्यार्थ्यांनी संविधानातील मूल्ये आचरणात आणावीत, असे आवाहन केले. तसेच लोकशाहीची जपणूक करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने आपली जबाबदारी ओळखणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. स्वयंसेवकांनी वैयक्तिक पातळीवर आपल्या गावामध्ये सुद्धा संविधान उद्देशिकेचे वितरण करून जनजागृती केली.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून शारीरिक शिक्षण संचालक सुभाष देशमुख, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. कैलास दातीर, ए. एन. ओ. प्रा.विजय नागपुरे, प्रा. सारिका पेरणे, उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थी व प्राध्यापकांनी एकत्रितपणे प्रस्तावनेचे वाचन करून संविधानाबद्दल आदर व्यक्त केला.

हा उपक्रम विद्यार्थ्यांमध्ये संविधानाबद्दल आदर, जबाबदारी आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना जागृत करणारा ठरला.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दुसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## द • ख • ल

### बेलापूरात माहेश्वरी समाज कार्यकारिणी जाहीर

अध्यक्षपदी लड्ढा, उपाध्यक्षपदी लखोटिया, सचिवपदी सिकची



**श्रीरामपूर** : तालुक्यातील बेलापूर येथे माहेश्वरी समाज (सभा ) नवीन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली.या निवडीमध्ये अध्यक्षपदी प्रसाद लड्ढा,उपाध्यक्ष निशिकांत लखोटिया तर,सचिवपदी गौरव सिकची, खजिनदारपदी शुभम सोमाणी यांची एकमताने बिनविरोध निवड करण्यात आली. तर, सहसचिव शैलेश राठी, संघटनमंत्री पदी पवन चांडक, सदस्यपदी विजय दरक, पुरुषोत्तम मुंदडा,प्रशांत लड्ढा, विष्णूकांत लखोटिया,आदीच्या जिल्हा कार्यकारिणीत सदस्य म्हणून निवड करण्यात आली.या कार्यकारणीचा कार्यकाळ सन २०२६ ते २०२९ यापर्यंत असून, बुधवारी बेलापूर येथे बैठक बुधवारी पार पडली. याप्रसंगी,जिल्हा माहेश्वरी समाज निवडणूक अधिकारी म्हणून नंदलालजी झंवर, महेश भराडीया, बाहेतीजी यांची उपस्थिती होती.

### म्हाळस पिंपळगाव येथे म्हसोबा महाराज यात्रोत्सवाची जय्यत तयारी

**चांदा** : नेवासा तालुक्यातील म्हाळस पिंपळगाव येथील जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध असलेल्या म्हसोबा महाराजांच्या यात्रोत्सवाची जय्यत तयारी पूर्ण झाली आहे. पंचक्रोशीतील भाविकांसाठी विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार (दि. १५ एप्रिल) रोजी गंगेवरून आणलेल्या कावडीची मिरवणूक जंगलातील म्हसोबा ते हनुमान मंदिर मार्गे देवस्थानापर्यंत काढण्यात येणार असून वाद्यांच्या गजरात जलाभिषेक होईल. रात्री म्हाळसादेवी ते म्हसोबा महाराज असा देवाचा छबिना निघणार असून आकर्षक दारूकामाची आतषबाजी करण्यात येईल. गुरुवार (दि.१६ एप्रिल) रोजी जंगी कुस्त्यांचा हंगाम तसेच रात्री वामनराव पाटोळे मेंढापुरकर यांच्या लोकनाट्य तमाशा मंडळाचा कार्यक्रम होणार आहे. शुक्रवार (दि.१७ एप्रिल) रोजी सकाळी हजऱ्याचा कार्यक्रम होईल. यात्रोत्सवात कोणताही गोंधळ घालू नये, अन्यथा कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशारा शनिशिंगणापूर पोलीस ठाण्याचे स.पो.नि. आशिष शेळके यांनी दिला आहे.

### दिघेवस्ती शाळेचा राज्यात 'लक्ष्यवेध'; प्रज्ञाशोध परीक्षेत दिमाखदार यश

**सोनगाव** : राहुरी तालुक्यातील आदर्श जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, दिघेवस्ती (धानोरे) येथील विद्यार्थ्यांनी लक्ष्यवेध राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करत राज्य व जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत मानाचे स्थान मिळवले आहे. या यशामुळे शाळेचा आणि गावाचा नावलौकिक राज्यभर झळकले आहे. राज्यस्तरीय गुणवत्ता यादीत इयत्ता पहिलीतील हर्ष सोनू अजय जाधव याने राज्यात सातवा क्रमांक पटकावला, तर इयत्ता दुसरीतील ओजस्वी सोनाली सोमनाथ अनाप हिने राज्यात चतुर्थ क्रमांक मिळवत भरीव यश संपादन केले. जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीतही विद्यार्थ्यांनी आपली छाप उमटवली. इयत्ता पहिलीतील मानवी प्रियंका रविंद्र अनाप हिने जिल्ह्यात तृतीय क्रमांक, तर स्वराली स्वाती सचिन अंत्रे हिने चतुर्थ क्रमांक मिळवला. इयत्ता दुसरीतील प्रणवी उज्ज्वला सुनील वाणी, शिवदीप माया दिपक काळे व शिवतेज सोनाली महेश अनाप या विद्यार्थ्यांनी अहिल्यानगर जिल्ह्यात पाचवा क्रमांक मिळवत उत्कृष्ट यशाची नोंद केली.

### महात्मा फुले विचारांचा जयघोष; इन्कलाबी नौजवान सभेची अभिवादन सभा




**श्रीरामपूर** : महात्मा जोतिबा फुले यांच्या द्विशताब्दी जयंतीनिमित्त इन्कलाबी नौजवान सभेच्या वतीने येथील भाकपा-माले पक्ष कार्यालयात अभिवादन सभा उत्साहात पार पडली. यावेळी तालुक्यातील कार्यकर्त्यांची लक्षणीय उपस्थिती होती. अभिवादन सभेत बोलताना जीवन सुरुडे यांनी महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव करत ते शिवजयंतीचे खरे जनक असल्याचे सांगितले. बहुजन समाजासाठी शिक्षणाची दारे खुली करण्यासाठी त्यांनी केलेला संघर्ष, महिला मुक्तीसाठीचे योगदान तसेच शेतकऱ्यांच्या न्यायासाठी त्यांनी उभारलेला लढा यावर त्यांनी प्रकाश टाकला. बहुजनांच्या पर्यायी इतिहासाची मांडणी आजही समाजाला नवी दिशा देणारी असल्याचे त्यांनी नमूद केले. श्रीकृष्ण बडाख यांनीही आपल्या भाषणातून फुले विचारांची आजच्या काळातील गरज अधोरेखित केली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुभान पटेल, दीपक शेळके, राहुल दाभाडे, आकाश शेळके, अनिल गायकवाड, अजय बत्तीसे आदींनी परिश्रम घेतले.

### मराठी बाणा जपतच प्रगती साधा : सुवर्णाताई विखे

**प्रवरानगर** : आधुनिक युगात प्रगती करताना मराठी अस्मिता जपणे ही प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन प्रवरा अभिमत विद्यापीठाच्या विश्वस्त सौ. सुवर्णाताई विखे पाटील यांनी केले. लोणी येथील ग्रामीण दंत महाविद्यालयाच्या वार्षिक पारितोषिक वितरण व स्नेहसंमेलन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर डॉ. शुभांगी म्हस्के, कुलसचिव डॉ. रवींद्र लावरे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेश जगदाळे, डॉ. उमेश पालेकर तसेच प्राचार्य डॉ. राजू अनर्थे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी प्राचार्य डॉ. अनर्थे यांनी प्रास्ताविक करत वार्षिक अहवाल सादर केला. कार्यक्रमात शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या किरण पठारे, वेदा खाडीलकर, साई शेट्टी व निकीता गुप्ता या सुवर्णपदक विजेत्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. स्नेहसंमेलनाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या 'मराठी बाणा' या संकल्पनेवर आधारित सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. महाराष्ट्राची लोककला, इतिहास आणि संस्कृतीचे सादरीकरण विद्यार्थ्यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निरज मोहाता, हार्दीकी येवतेकर, मेघा आसनानी, साक्षी सोंबरे, सुजाता चौधरी, वैष्णवी देशमुख, तन्मयी झूंजारराव व चंदा निकम यांनी केले. कार्यक्रमाला विद्यार्थी, प्राध्यापक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रोहयोतील कामबंद आंदोलनाचा फटका; मजुरांवर उपासमारीची वेळ

## घरकुल, विहीर, पशुपालनाशी संबंधित कामे ठप्प



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**म्हैसगाव** : रोहयो (महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना) अंतर्गत कार्यरत रोजगार सहाय्यकांनी १ एप्रिलपासून सुरू केलेल्या कामबंद आंदोलनाचा थेट परिणाम रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुरांवर होत असून अनेकांना उपासमारीची वेळ आली आहे. शासनाला निवेदन देऊन १ तारखेपासून काम बंद केले आहे आज जवळ जवळ १२ दिवस झाले आहे तरी सरकार बंद कडे लक्ष देत नाही त्यांना ही काम बंद करायाचे की काय असा प्रश्न ग्रामस्थ मध्ये तयार झाला आहे इतर राज्यमध्ये चालू आहे पण महाराष्ट्र सरकार लक्ष देऊन तरी काम चालु करणे गरजेचे आहे परंतु त्यावर सरकार निर्णय घ्यायला शासनाने जी आर ( ऋ‍ठ )लागू कराया असफल झाल्यामुळे रोजगार सहाय्यकांनी आंदोलन उभे केले आहे त्याचा परिणाम गाव पातळीवर रोजंदारी करणाऱ्या ग्रामस्थांवर चालू झाला आहे.

ग्रामपातळीवर सुरू असलेली विविध कामे सध्या पूर्णपणे ठप्प झाली आहेत. यामध्ये घरकुल बांधकाम, विहीर खोदकाम, गाय-गोठा, शेळीपालन शेड, कुकुटपालन शेड ,बांधावर वृक्ष लागवड ,रस्त्याच्या कडेने वृक्ष लागवड ,संडास बांधणे , वन विभागतील वृक्ष तयार करणे असे अनेक कामांचा समावेश आहे. या सर्व कामांसाठी आवश्यक असलेले (मस्टर )मजुरी बंद झाल्यामुळे मजुरांना मिळणारी रोजंदारी अचानक थांबली आहे. दररोजच्या कमाईवर उदरनिर्वाह करणाऱ्या कुटुंबांसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले आहे. काम बंद असल्यामुळे अनेक मजुरांना पर्यायी रोजगाराच्या शोधात इतर ठिकाणी जावे लागत आहे. काही ठिकाणी तर कुटुंबाच्या गरजा भागवण्यासाठी कर्ज घेण्याची वेळही आली आहे.

दरम्यान, संबंधित प्रशासनाने लवकरात लवकर यावर तोडगा काढून बंद पडलेली कामे सुरू करावीत, शासनाने रोजगार सहाय्यकासाठी काढलेला जी आर ( ऋ‍ठ ) व इतर मागण्या मान्य करून काम चालू करण्यात यावे त्यांना न्याय द्यायचा नव्हता तर जी आर कोणत्या कारणासाठी काढला आहे हा फक्त दाखवण्यासाठी आहे की काय असे प्रश्न ग्रामस्थांमध्ये निर्माण झाले आहे यासाठी दिलेला अशी मागणी मजुरांकडून होत आहे. अन्यथा ग्रामीण भागातील गरीब कुटुंबांचे हाल अधिकच वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## बालाजी देडगाव येथे महात्मा फुले जयंती उत्साहात



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बालाजी देडगाव** : नेवासा तालुक्यातील बालाजी देडगाव येथे श्री संत सावता युवा प्रतिष्ठानच्या वतीने क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. तांबे वस्ती येथील संत शिरोमणी सावता महाराज मंदिर परिसरात झालेल्या कार्यक्रमास ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा फुले, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले, छत्रपती शिवाजी महाराज तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. 'महात्मा फुले यांचा विजय असो' व 'जय जोति, जय क्रांती'च्या घोषणांनी परिसर दुमदुमला. ज्येष्ठ पत्रकार बन्सीभाऊ एडके यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात आविनाश तांबे यांनी प्रास्ताविक केले. पोपट बनसोडे, निलेश कोकरे, सरपंच चंद्रकांत मुंगसे, संभाजी लोंढे व मुख्याध्यापक स्वरूपचंद गायकवाड यांनी महात्मा फुले यांच्या कार्य व विचारांवर प्रकाश टाकला.

'शेतकऱ्याचा आसूड' व 'गुलामगिरी' या ग्रंथांचा संदर्भ देत शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. यावेळी अभिजित ससाणे यांनी युवकांनी शिक्षणातून समाजप्रगती साधावी, असे आवाहन केले. तसेच गौरव खंडेराव तांबे यांचा एमबीबीएस प्रवेशाबद्दल सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन युनूस पठाण यांनी केले, तर आभार निवृत्ती तांबे यांनी मानले. स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## डॉ. आंबेडकर जयंती उत्साहात साजरा करा : पोलीस निरीक्षक महेश पाटील



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : महात्मा ज्योतिबा फुले व महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवून त्यांच्या विचारांचा व कार्याचा संदेश देत उत्साहात साजरी करा असे आवाहन नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी केले. शनिवारी दि.११ एप्रिल रोजी नेवासे पोलीस ठाण्याच्या प्रांगणात डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंतीचे प्रमुख पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते व नगरसेवक यांच्यासह तालुक्यातील व नेवासा शहरातील शांतता समिती सदस्यांची महत्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी तालुक्यातील विविध ठिकाणी निघणाऱ्या सर्व जयंती प्रमुखांनी कायदा व सुव्यवस्था व विविध अडचणी संदर्भात आवश्यक सुचना उपस्थितांनी यावेळी प्रशासना कडे मांडल्या. जयंती साजरी करतांना शांतता कमिटी सदस्य व जयंती उत्सव प्रमुख यांच्यावर मोठी जबाबदारी असणार आहे, आपल्या गावातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रत्येकांने योगदान दयावे तसेच जयंती दरम्यान अनुचित प्रकार टाळण्यासाठी घडामोडीवर बारीक नजर ठेवून आम्हाला सुचना द्याव्यात. त्याच बरोबर नेवासा पोलीस ठाण्याच्या हद्दीत डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करणाऱ्या प्रमुखांनी कायदेशीर परवानगी घेऊन मिरवणूक काढावी, व जयंती उत्सव उत्साहात साजरा करा, असे आव्हान पोलीस निरीक्षक महेश पाटील यांनी केले. यावेळी नेवासे शहारासह तालुक्यातील उत्सव समितीचे प्रमुख व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मनपा क्रिकेट स्पर्धेत घनकचरा विभाग विजेता

### प्रभाग समिती क्रमांक दोन उपविजेता; अटीतटीच्या सामन्यांनी रंगली स्पर्धा



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : महानगरपालिकेच्या वतीने पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित क्रिकेट स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत एकूण १२ संघांनी सहभाग नोंदवला होता. सर्व सामन्यांमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली आणि खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रेक्षकांची मने जिंकली.

या स्पर्धेत पदाधिकारी, स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे, प्रशासकीय कार्यालय 'अ' (आयुक्त यशवंत डांगे), प्रशासकीय कार्यालय 'ब' (उपायुक्त मेहेर लहारे), प्रभाग समिती कार्यालय एक (राहुल साबळे), प्रभाग समिती कार्यालय दोन (अमोल बोजा), प्रभाग समिती कार्यालय तीन (श्याम शिंदे), प्रभाग समिती कार्यालय चार (हबीब शेख), शिक्षण विभाग (अक्षय शिंदे), घनकचरा विभाग (शुभम उपलची), आरोग्य विभाग (डॉ. सतीश राजुरकर) आदी संघांनी सहभाग घेतला. स्पर्धेतील उपांत्य फेरीत प्रभाग समिती कार्यालय दोन व तीन यांच्यात अटीतटीची लढत झाली, ज्यामध्ये प्रभाग समिती कार्यालय दोनने अंतिम फेरीत प्रवेश मिळवला. दुसऱ्या उपांत्य फेरीत प्रशासकीय कार्यालय 'ब' व घनकचरा विभाग यांच्यात रोमांचक सामना रंगला, ज्यात घनकचरा विभागाने विजय मिळवत फायनलमध्ये धडक मारली. अंतिम सामना घनकचरा विभाग व प्रभाग समिती कार्यालय क्रमांक दोन यांच्यात रंगला.

या सामन्यात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत घनकचरा विभागाने विजेतेपद पटकावले, तर प्रभाग समिती क्रमांक दोन संघ उपविजेता ठरला. या स्पर्धेमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सांघिकतेची भावना जपत खेळाचा मनसोक्त आनंद घेतला. कामाच्या ताणतणावातून बाहेर पडत क्रीडांगणावर सर्वांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि आपल्या कलागुणांना वाव दिला. क्रीडा अधिकारी व्हिन्सेंट फिलिप्स यांनी स्पर्धेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल सर्व खेळाडू व सहभागींचे आभार मानले.

## तळेगाव पाणीपुरवठा योजना दीड वर्षांपासून बंद

### नागरिकांचे पाण्यासाठी हाल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : दुष्काळी भागातील तळेगावसह १६ गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी सुरू करण्यात आलेली प्रादेशिक पाणीपुरवठा योजना मागील दीड वर्षांपासून ठप्प असल्याने नागरिकांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. या योजनेमुळे पूर्वी अनेक गावांमध्ये नियमित पाणीपुरवठा होत होता, मात्र नोव्हेंबर २०२४ पासून योजना बंद पडल्याने परिस्थिती बिकट झाली आहे. लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या पुढाकारातून प्रवरा नदीवर आधारित ही योजना राबविण्यात आली होती. तळेगाव, चिंचोली गुरव, तिगाव, काकडवाडी, पारेगाव, नान्नज दुमाला, देवकवठे, वरझडी बुद्रुक-खुर्द अशा १६ गावांना या योजनेतून पाणीपुरवठा केला जात होता. स्थानिक समितीच्या माध्यमातून माफक दरात पाणीपट्टी आकारून योजना सुरळीत सुरू होती. अडचणी निर्माण झाल्यास तत्काळ उपाययोजना करून योजना कार्यान्वित ठेवली जात होती. मात्र गेल्या दीड वर्षांपासून योजना बंद असल्याने काकडवाडी, चिंचोली गुरव, पारेगाव आदी गावांमध्ये पाण्याची तीव्र टंचाई जाणवत आहे. काही ठिकाणी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात आल्याचे दिसले, परंतु तोही अल्पकाळच मर्यादित राहिल्याने नागरिकांचा संताप वाढला आहे. महिलांना पाण्यासाठी वणवण करावी लागत असल्याची स्थिती आहे. दरम्यान, विविध गावांतील नागरिकांनी बाळासाहेब थोरात यांची भेट घेऊन योजना तातडीने पुन्हा सुरू करण्याची मागणी केली आहे. तसेच कोल्हेवाडी येथील काही स्थानिक पदाधिकाऱ्यांकडून पाईपलाईन कामात अडथळे आणले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला असून, या कामात अडथळे आणू नयेत, अशी मागणीही करण्यात आली आहे.

## रेल्वे मालधक्का प्रकल्पाविरोधात नागरिक आक्रमक; विस्थापन नको

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : प्रस्तावित रेल्वे मालधक्का प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर सेंट्रल रेल्वेकडून अतिक्रमण हटविण्याच्या नोटिसा देण्यात येत असल्याने परिसरातील नागरिकांमध्ये भीती व अस्वस्थतेचे वातावरण निर्माण झाले आहे. अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या कुटुंबांना अचानक विस्थापित करण्याचा प्रयत्न होत असल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या संदर्भात सामाजिक कार्यकर्ते तिलक डुंगरवाल, विकास डेंगळे व स्थानिक नागरिकांनी माजी खा. डॉ. सुजय विखे यांची भेट घेऊन आपली व्यथा मांडली. प्रकल्पाच्या नावाखाली कोणत्याही कुटुंबाचे विस्थापन होऊ नये, यासाठी तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी करण्यात आली.



तसेच प्रस्तावित मालधक्क्यामुळे उडणारी धूळ, दुर्गंधी व वाढते प्रदूषण यामुळे स्थानिक रहिवासी, विद्यार्थी व रुग्णांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली. त्यामुळे हा प्रकल्प गावाबाहेरील ठिकाणी उभारावा, अशी मागणी करण्यात आली. यावेळी खासदारांनी नागरिकांच्या प्रश्नांकडे सकारात्मक दृष्टीने पाहत संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. नागरिकांनीही अन्यायकारक विस्थापन सहन केले जाणार नसल्याचा ठाम इशारा दिला.

या प्रसंगी प्रसाद कटके, युवराज घोरपडे, गणेश भाडंगे, अभिजित मोरे, मुबारक शेख, भागवत घुगे, सोमनाथ पवार, राहुल शेटे, काळे पाटील आदींसह अनेक नागरिक उपस्थित होते.

> **मालधक्क्यामुळे वाढते प्रदूषण; आरोग्यावर गंभीर परिणाम**
>
> प्रस्तावित रेल्वे मालधक्क्यामुळे उडणारी धूळ, दुर्गंधी आणि वाढते प्रदूषण यामुळे स्थानिक रहिवाशांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. विशेषतः शाळा-कॉलेजमधील विद्यार्थी तसेच रुग्णालयातील रुग्ण यांना श्वसनासंबंधित व इतर आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. म्हणूनच, नागरिकांच्या आरोग्याचा विचार करून रेल्वे मालधक्का हा गावाच्या बाहेरील भागात उभारण्यात यावा.
>
> **तिलक डुंगरवाल (सामाजिक कार्यकर्ते)**

# विद्यार्थ्यांना अधिकारी घडविण्याचे स्वप्न पुर्ण होत असल्याचा अभिमान : ना. विखे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना प्रशासकीय अधिकारी घडविण्याचे स्वप्न आता सत्यात उतरत असल्याचा निश्चितच अभिमान वाटतो. प्रवरा स्पर्धा परीक्षा केंद्राच्या माध्यमातून भविष्यातही जास्तीत जास्त विद्यार्थी घडावेत आणि त्यांनी प्रशासकीय सेवेत आपला नावलौकिक निर्माण करावा, अशी अपेक्षा महसूल तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी व्यक्त केली. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्राचा लाभ ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणावर होत आहे.



सध्या राहाता तालुक्यातील चार ठिकाणी ही केंद्रे कार्यरत आहेत.

या केंद्रांच्या मार्गदर्शनामुळे आतापर्यंत १५८ विद्यार्थ्यांची प्रशासकीय सेवेत निवड झाली असून, सध्या २१३ विद्यार्थी येथे प्रशिक्षण घेत असल्याची माहिती नामदार विखे पाटील यांनी दिली.

प्रवरा स्पर्धा परीक्षा केंद्राच्या माध्यमातून राहता तालुक्यातील वृंदा बाळासाहेब निर्मळ (सहायक विक्रीकर अधिकारी, मुंबई), अवधूत भास्कर भुजबळ (ठाणे पोलीस प्रशासन), तुषार सुनील डांगे (ठाणे पोलीस प्रशासन), अक्षय कैलास निर्मळ (पुणे पोलीस प्रशासन) आणि किरण भास्कर शेलार (पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती), सौरभ घोरपडे (ज्युनियर असिस्टंट), साहिल जाधव (पुणे शहर पोलीस), गणेश जगताप (महाराष्ट्र सुरक्षा दल), निखिल जगताप (महाराष्ट्र सुरक्षा दल) यांची निवड झाल्याबद्दल मंत्री विखे पाटील यांनी जनता दरबारामध्ये या विद्यार्थ्यांचा सन्मान करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी मंत्री विखे म्हणाले की, अतिशय मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर सर्वसामान्य कुटुंबातील मुले स्पर्धा परीक्षेत यश मिळवत आहेत, ही बाब अत्यंत अभिमानास्पद आहे. आपल्या भागातील तरुण प्रशासकीय सेवेत दाखल होत असल्याचे मोठे समाधान वाटते. दरम्यान, मंत्री विखे यांनी 'जनता दरबार' आयोजित करून नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी सार्वजनिक आणि वैयक्तिक प्रश्नांबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या असून, निर्धारित वेळेत लोकांची कामे मार्गी लावण्याचे आदेशही दिले.

## पान १ वरुन

### कंत्राटदारांच्या आंदोलनाला ब्रेक

वर्षांपासून न बदललेले डीएसआर दर अद्ययावत करण्यासाठी नागपूर येथील मुख्य अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली तातडीने बैठक घेण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच कंत्राटदारांच्या नोंदणी नूतनीकरण प्रक्रियेत शिथिलता आणण्याचेही आश्वासन देण्यात आले.

कंत्राटदारांच्या अडचणी व प्रश्न तत्काळ सोडवण्यासाठी संघटनांनी थेट सचिव व मंत्र्यांकडे मांडावेत, असे निर्देशही देण्यात आले असून निधी वितरणात सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात येणार आहेत.

दरम्यान, या निर्णयांमुळे कंत्राटदारांमध्ये समाधान व्यक्त होत असून राज्यभरातील कामबंद आंदोलन स्थगित करण्यात आल्याची घोषणा करण्यात आल्याची माहिती अक्षय कराड, गणेश श्रीराम, वैष्णव मिसाळ, अविनाश ओहळे यांनी माहिती दिली.

### अशोक खरातची शक्तीपीठ महाम ार्ग परिसरात ११ एकर जमीन

मात्र भोंदू अशोक खरात याने तब्बल २१ ते २२ लाख रुपये प्रति एकर ही जमीन खरेदी केली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, उत्तर सोलापूर तालुक्यातील कळमण हद्दीत पत्नीच्या नावे जमीन खरेदी केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. नियोजित शक्तिपीठ महामार्ग कळमण हद्दीतून जाणार असल्याची माहिती मिळाल्याने भोंदूबाबा अशोक खरात याने ही जमीन खरेदी केली असल्याची शक्यता आहे.

### राष्ट्रसंत भास्करगिरी महाराजांना मातृशोक

अध्यक्ष देवीदास महाराज म्हस्के, उद्धव महाराज मंडलिक, हभप सारंगधर महाराज, गोविंद महाराज जाटदेवळेकर, भागवताचार्य समाधान महाराज शर्मा, आळंदी येथील बाजीराव महाराज चंदेले नाना, कैलासगिरी महाराज, शालीनीताई विखे, विश्व हिंदू परिषदेचे आप्पा बारगजे, केशव महाराज उखळीकर, आळंदी येथील डॉ. नारायण महाराज जाधव, आ. विठ्ठलराव लंघे यांनी श्रद्धांजली वाहिली. वेदशास्त्र संपन्न ब्रम्हवृंदांनी केलेल्या पुजाविधी मध्ये महंत भास्करगिरी बाबा, उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज सहभागी झाले होते. यावेळी महंत कैलासगिरी महाराज, सदगुरू नारायणागिरी आश्रमाचे महंत उद्धव महाराज मंडलिक, संत ज्ञानेश्वर मंदीर देवस्थानचे महंत देविदास महाराज म्हस्के शास्त्री, श्रीराम साधना आश्रमाचे महंत सुनिलगिरी महाराज, महंत नारायणनंदगिरी महाराज, आळंदी येथील हभप चंदेले नाना, येळेश्वर देवस्थानचे महंत रामगिरी महाराज, वेरुळ येथील नाथ आश्रमाच्या साध्वी अक्का महाराज, साध्वी सुवर्णानंदगिरी चैतन्य, मध्यमेश्वर देवस्थानचे महंत ऋषीनाथ महाराज, रामकृष्ण आश्रमाचे महंत भगवान महाराज जंगले शास्त्री,म हंत हरीशरणागरीजी महाराज, महंत नंदकिशोर खरात महाराज,हभप राम महाराज झिंजुरके,हभप बाळकृष्ण महाराज दिघे,गहीनीनाथ म हाराज,महंत योगीराज दादा महाराज वायसळ, हनुमान गडाचे संतोष महाराज चौधरी,हरी महाराज वाकचौरे, आळंदी येथील माजी आ. पांडुरंग अभंग, बाळासाहेब मुरकुटे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालीनीताई विखे, राजश्रीताई घुले, नगराध्यक्ष डॉ.करणसिंह घुले यांच्यासह हजारो भाविक उपस्थित होते.

### २१ तास चर्चा... तरी शांतीवार्ता फिस्कटली

सुरूवात केली आहे. अमेरिकेची यूएसएस पिचेल मर्फी आणि यूएसएस पीटरसन, या दोन सुरुंगविरोधी कामात कुशल युद्धनौकांनी ही मोहीम हाती घेतली आहे. या सामुद्रधुनीत आम्ही नवा मार्ग तयार करीत आहोत. या माध्यमातून जागतिक समुद्री व्यापारी मार्ग सुरक्षित करू, असं अमेरिकेच्या केंद्रीय कमांडचे प्रमुख ॲडमिरल ब्रॅड कूपर यांनी म्हटले आहे.

### मुख्यमंत्री सहायता निधीसाठी ऑनलाईन पोर्टल

मदतीचा निर्णय रुग्णालय आणि नातेवाईकांना कळवला जाईल. कागदपत्रे उशिरा अपलोड झाल्यास दुसऱ्या दिवशी कार्यालयीन वेळेत निर्णय दिला जाईल. तसेच मंजूर झालेली पूर्ण रक्कम एकाच वेळी न देता, सुरुवातीला ३०% रक्कम आणि उर्वरित रक्कम रुग्णाला डिस्चार्ज मिळताना दिली जाईल, अशी देखील माहिती आहे.२०२५ मध्ये या निधीतून ४०,७७६ रुग्णांना सुमारे ३३३.६ कोटी रुपयांची मदत करण्यात आलीय. आता कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीच्या म ाध्यमातून ही मदत आणखी वाढवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे. तर कॅन्सरग्रस्त मुलांच्या उपचारांसाठी टाटा मेमोरियल हॉस्पिटल आणि 'भारत पेट्रोलियम' सोबत त्रिपक्षीय करार करण्यात आला आहे. याम ुळे अशा मुलांना मोफत उपचार मिळण्यास मदत होईल. या नवीन डिजिटल प्रणालीचा शुभारंभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुढील आठवड्याच्या सुरुवातीला होण्याची शक्यता आहे.

### बेकायदा सावकारांची वसुली प्रकरणे फेटाळून लावा

कोणतीही विलंब न करता तातडीने कारवाई करावी. यासाठी नवीन कायद्याची वाट पाहण्याची गरज नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले. यावर स्पष्टीकरण देताना न्यायालयाने ठामपणे सांगितले की, अनेक राज्यांमध्ये अस्तित्वात असलेल्या कायद्यांनुसार परवाना नसताना कर्ज देणे हे स्पष्टपणे बेकायदेशीर आहे

# सायबर सुरक्षितता ग्राहकांचा विश्वास टिकवण्यासाठी महत्त्वाची : आ. खताळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** सध्याच्या वेगाने बदलणाऱ्या काळात सहकारी बँकिंग क्षेत्र नव्या टप्प्यावर उभे असून, आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार केल्याशिवाय प्रगती शक्य नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता (कृबु) मुळे बँकिंग सेवा अधिक वेगवान, अचूक आणि सुरक्षित होत असून सायबर सुरक्षितता ही ग्राहकांचा विश्वास टिकवण्यासाठी अत्यंत महत्त्वाची बाब आहे, असे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले.

कासारा दुमाला (ता. संगमनेर) येथील मालपाणी हेल्थ क्लब येथे अहिल्यानगर जिल्हा नागरी सहकारी बँका संघटनेच्या वतीने आयोजित सहकारी बँक संमेलनाचे उद्घाटन आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते झाले. त्यावेळी मार्गदर्शन करताना



आ. खताळ म्हणाले की, सध्याच्या माहिती तंत्रज्ञानाच्या काळामध्ये बँकांनी डिजिटल, सुरक्षित आणि ग्राहकाभिमुख बँकिंगकडे वाटचाल करताना युवकांसाठी आधुनिक सेवा व नवकल्पनांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर आणि सहकाराची ताकद यामुळेच भविष्यातील बँकिंग क्षेत्र अधिक सक्षम व विश्वासार्ह होईल. असेही आमदार खताळ यांनी सांगितले.

अहिल्यानगर जिल्हा नागरी सहकारी बँक संघटना ही सन १९८३ पासून कार्यरत असून, तिच्या माध्यमातून १८ सभासद व १७ सहयोगी अशा एकूण ३५ बँकांना एकत्र आणण्यात आले आहे. विविध प्रशिक्षण उपक्रम, कायदेशीर वसुली प्रक्रिया तसेच भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार बँकांच्या अडीअडचणी सोडविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संघटना करत असल्याची माहिती संघटनेच्या अध्यक्ष सत्येन मुंदडा यांनी आपल्या प्रस्ताविकातून दिली. यावेळी मधुसूदन नावंदर प्रकाश राठी नानासाहेब शिंदे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## निधन वार्ता

### लताबाई येवले



**राहुरी :** येथील लताबाई दत्तात्रय येवले (वय ६६) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. त्या राहुरी फ्रुटग्रोवर सोसायटीचे उपाध्यक्ष दत्तात्रय येवले यांच्या पत्नी तर पांडुरंग व रेवणनाथ येवले यांच्या मातोश्री होत.

### आण्णासाहेब आसने



**माळवाडगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील माळवाडगाव येथील धार्मिक वृत्तीचे आण्णासाहेब बाबुराव आसने यांचे (वय ७२) अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली, पाच भाऊ, तीन बहिणी, पुतणे, सुना, नातवंडे असा मोठा परिवार असून सामाजिक कार्यकर्ते शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष जालिंदर आसने व सोमनाथ आसने यांचे ते वडील होत.

## खडांबे येथील हायस्कूलमध्ये जल कुंभाचे उद्घाटन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** विद्यार्थ्यांना स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी निओ लॉजिक इंजिनिअर्स प्रा. लि., पुणे यांच्या उडठ निधीतून रोटरी क्लब ऑफ राहुरी सेंट्रलच्या माध्यमातून शाहू विद्यामंदिर, खडांबे (ता. राहुरी) येथे ४,००० लिटर क्षमतेच्या जलकुंभाचे उद्घाटन करण्यात आले.

या जलकुंभाचे उद्घाटन अहमदनगर जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाजाचे विश्वस्त जयंत वाघ यांच्या हस्ते झाले. यावेळी दीपक दरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी स्वच्छ पिण्याच्या पाण्याचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमास निओ लॉजिक इंजिनिअर्सचे संचालक इंजि. रविंद्र महाजन, सुमित्रा महाजन, चिन्मय व सोहम महाजन, रोटरी क्लब ऑफ राहुरी सेंट्रलचे अध्यक्ष इंजि.



अविनाश साबरे, भारती साबरे, श्रेयस साबरे, सचिव डॉ. जयंत कुलकर्णी तसेच मुख्याध्यापक मकरंद रायते, पर्यवेक्षक आप्पासाहेब शिंदे, शिक्षकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याशिवाय गावातील सुरसिंगराव पवार, स्क्काड्रन लिडर कल्हापूरे, बाळासाहेब लटके आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

४,००० लिटर क्षमतेच्या जलकुंभामुळे विद्यार्थ्यांना दिवसभर स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध होणार असून, विशेषतः उन्हाळ्यात याचा मोठा फायदा होणार आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहुल जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन मकरंद रायते यांनी केले.

## विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव द्या : गटशिक्षणाधिकारी शबाना शेख

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पोहेगाव :** विद्यार्थ्यांमधील मोबाईल व सोशल मीडियाचे वाढते व्यसन रोखण्यासाठी पालकांनी त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन गटशिक्षणाधिकारी शबाना शेख यांनी केले. त्या रवंदे येथील पी.एम. श्री. जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलन प्रसंगी बोलत होत्या.

कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच ऋषिकेश कदम उपस्थित होते, तर अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे ज्येष्ठ सदस्य सुभाष दवंगे होते. शेख यांनी पुढे सांगितले की, सोशल मीडियाच्या अतिवापरामुळे विद्यार्थ्यांचे अभ्यासाकडे दुर्लक्ष होत असून हे भविष्यासाठी धोकादायक आहे. त्यामुळे पालकांनी मुलांमध्ये वाचनाची सवय लावून त्यांच्या अंगभूत कलागुणांना प्रोत्साहन द्यावे.

प्रास्ताविकात मुख्याध्यापक प्रभाकर कदम यांनी शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. उपसरपंच ऋषिकेश कदम यांनी मातृभाषेतून शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेण्याचे आवाहन केले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शशिकांत सोनवणे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या प्रगतीत जिल्हा परिषद शाळांची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले.

स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर, धार्मिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. पोवाडे व नाट्यप्रयोगांना विशेष दाद मिळाली.

यावेळी सरपंच शोभाताई भवर, साहेबराव लामखडे, तान्हाजी लामखडे, ग्रामविकास अधिकारी राजेंद्र बागले, विस्तार अधिकारी बाबाजी इरोळे, केंद्रप्रमुख विलास भांड, रावसाहेब लांडे यांच्यासह अनेक मान्यवर, शिक्षक व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करण्यात आले असून आभार प्रदर्शन शिक्षक अशोक कानडे यांनी केले.



## जगदंबा यात्रेच्या त्रिदिनात्मक धार्मिक सोहळ्याची सांगता

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** नेवासा बुद्रुक येथील जगदंबा यात्रेच्या निमित्ताने आयोजित त्रिदिनात्मक धार्मिक सोहळयाची संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे प्रमुख महंत वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या काल्याच्या किर्तनाने रविवारी काल्याची दहीहंडी फोडून भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली.दुःखरूप जीवाने परमात्म्याच्या संगतीत रहाणे म्हणजे काला असून जन्म मरणाच्या व्यथा चुकविण्यासाठी देवाचे नामचिंतन जीवनात करा असे आवाहन देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांनी यावेळी बोलतांना केले.



यावेळी झालेल्या काल्याच्या किर्तन प्रसंगी बोलतांना देविदास महाराज म्हस्के शास्त्री म्हणाले की जीवाने आपले अस्थित्व परमेश्वराला समर्पित करणे त्याला काला म्हणतात,मनुष्य जन्म देवाच्या नामस्मरण करण्यासाठी आहे याची आठवण करून देण्याचे काम संत करतात, नारायणाच्या प्राप्तीसाठी नामस्मरण करणे हेच मानवी जीवनाचे ध्येय असल्याचे त्यांनी यावेळी बोलतांना सांगितले. सदर कीर्तनात त्यांनी श्रीकृष्ण परमात्म्याच्या बाललीलांचे वर्णन केले. यावेळी हजारो भाविकांच्या उपस्थितीत जगदंबा यात्रेनिमित्त आयोजित त्रिदिनात्मक धार्मिक सोहळयासह किर्तन महोत्सवाची सांगता काल्याची दहीहंडी फोडून करण्यात आली.यावेळी सोहळा कमिटीच्या वतीने त्रिदिनात्मक धार्मिक सोहळयासाठी अन्नदानासह योगदान देणाऱ्या दात्यांचा श्रीफळ उपरणे देऊन गुरुवर्य देविदास महाराज यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

यावेळी झालेल्या काल्याच्या किर्तन प्रसंगी कोंडीराम महाराज पेचे,अगस्ती ऋषी आश्रमाचे सेवेकरी हभप भिसे बाबा, गायनाचार्य ज्ञानेश्वर माऊली शिंदे,शंकर महाराज तनपूरे, दामोदर महाराज पवार, मृदुंगाचार्य किरण महाराज डीवरे, संत गाडगेबाबा भजनी मंडळाचे प्रमुख गोकुळनाना जायगुडे, पुंजाराम महाराज पेचे, विणेकरी केशव महाराज डौले, माजी सरपंच प्रकाश सोनटक्के यांच्यासह आम्ही सेवेकरी तरुण मंडळाचे सदस्य व पंचक्रोशीतील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित हजारोभाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

### गंगापुरात शांतता कमिटीची बैठक संपन्न

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी करण्यासाठी गंगापूर पोलिस ठाण्यात शांतता कमिटीची बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. सहायक पोलिस निरीक्षक अवधूत मस्के यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत नियोजनाबाबत विविध सूचना करण्यात आल्या. कमिटीचे सदस्य बाबा भिवसने व इतरांनी मिरवणूक मार्गावरील खड्डे बुजवणे, लोंबकळणाऱ्या वीजतारांची दुरुस्ती, राजवाडा परिसराची स्वच्छता आणि जयंतीदिनी दारू विक्री बंद ठेवण्याची मागणी केली. अध्यक्षांनी या सूचनांची दखल घेत संबंधित विभागांना तत्काळ अंमलबजावणीचे निर्देश दिले. यावेळी लक्ष्मीकांत माघाडे,बापू खाजेकर, सिद्धार्थ खाजेकर, वैभव खाजेकर, सागर खाजेकर यांच्यासह उत्सव समितीचे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गोवंशाची अवैध वाहतूक उघड
### तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** तालुक्यात गोवंश जनावरांची कत्तलीच्या इराद्याने अवैध वाहतूक होत असल्याच्या घटनांमध्ये वाढ होत असून, शनिवारी (दि. ११) आणखी एक प्रकार उघडकीस आला. नांदगाव शिवारात प्रवासी रिक्षामधून गोवंश जनावरांची वाहतूक केली जात असल्याची माहिती नागरिकांनी डायल ११२ वर दिल्यानंतर पोलिसांनी तातडीने कारवाई केली. पोलीस निरीक्षक सत्यजित ताईतवाले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी विकास नजन व रंधे यांनी दुपारी घटनास्थळी धाव घेतली. तपासणीदरम्यान रिक्षा (क्र. चक २० इढ ७६३९) आढळून आली. त्याठिकाणी उभ्या असलेल्या दोन इसमांना पोलिसांनी चौकशी केली असता त्यांनी आपली नावे हुसेन खालिक कुरेशी व नवाज सलीम कुरेशी (दोघेही रा. खान गल्ली, वैजापूर) अशी सांगितली. वाहनाची झडती घेतली असता रिक्षामध्ये गोणीत दोन गायींचे बछडे आढळून आले. पोलिसांनी तत्काळ दोन्ही बछडे व रिक्षा असा सुमारे ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

चौकशीदरम्यान सदर बछडे बाबासाहेब रोठे (रा. नांदगाव) यांच्याकडून घेतल्याची माहिती समोर आली.

या प्रकरणी वैजापूर पोलीस ठाण्यात सायंकाळी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.


**Change Of Name**

Old name: HASINA BI SHAIKH MOHAMMED ANIS IS ON MY OLD PASSPORT. and My New Name is HASINA ANIS ATTAR as on Aadhar Card Number is 8310 5030 0698 (12/04/2026)



# प्रामाणिकपणाचा आदर्श ; लॉज कर्मचाऱ्याने परत केली सोन्याची अंगठी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** सध्याच्या मतलबी युगात प्रामाणिकपणा दुर्मिळ होत चालल्याची भावना व्यक्त केली जाते; मात्र शिऊर येथील (एस टॉवर) लॉजमधील कर्मचारी मोहनलाल ने दाखवलेल्या प्रामाणिकतेमुळे समाजात अजूनही सद्गुण जिवंत असल्याचे अधोरेखित झाले आहे. लॉजमध्ये मुक्कामाला आलेल्या उत्तर प्रदेशातील दांपत्याची सुमारे १० ग्रॅम वजनाची (अंदाजे १ लाख ५५ हजार रुपये किंमतीची) सोन्याची अंगठी प्रामाणिकपणे परत केल्याची घटना रविवार (दि. १२ एप्रिल) घडली.

दिनेश गौतम व सुंदरी गौतम (रा. बलरामपूर, उत्तर प्रदेश) हे पती-पत्नी आयुर्वेदिक उपचारासाठी शिऊर येथे आले होते. त्यांनी सायंकाळी एस टॉवर लॉजमध्ये मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी दवाखान्यात जाऊन परत आल्यानंतर काही वेळ विश्रांती घेऊन त्यांनी रूम सोडली आणि वैजापूरच्या दिशेने प्रयाण केले.

दरम्यान, रूमची साफसफाई करताना लॉजच्या मॅनेजरला कॉटच्या कोपऱ्यात सोन्याची अंगठी आढळली. त्यांनी तत्काळ लॉज मालक



योगेश्वर राऊत यांना याची माहिती दिली. कोणताही विलंब न करता व्यवस्थापनाने संबंधित ग्राहकांशी संपर्क साधला. तोपर्यंत गौतम दांपत्य वैजापूरपर्यंत पोहोचले होते. अंगठी हरवल्याचे लक्षात येताच त्यांनी तातडीने शिऊरला परत येत लॉज गाठले.

लॉज व्यवस्थापनाने ओळख पटवून अंगठी त्यांच्याकडे सुपूर्त केली. अंगठी परत मिळाल्याने गौतम कुटुंबीयांचा आनंद गगनात मावेनासा झाला. त्यांनी कर्मचाऱ्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत ५ हजार रुपयांचे बक्षीस देऊ केले; मात्र पैशांसाठी असते तर अंगठी परत केली नसती, तुमच्या चेहऱ्यावरचा आनंदच आमच्यासाठी मोठे समाधान आहे, असे सांगत लॉज मालक योगेश्वर राऊत यांनी बक्षीस नम्रपणे नाकारले.

मी गेल्या तीन वर्षांपासून येथे काम करत असून, यापूर्वीही मोबाईल व रोख रक्कम सापडल्यावर संबंधितांना परत केली आहे. कष्टाने कमावलेल्या पैशाचा आनंद वेगळाच असतो, असे संबंधित कर्मचाऱ्याने सांगितले.

तर मर्यादित पगार असूनही कर्मचाऱ्यांनी दाखवलेला प्रामाणिकपणा कौतुकास्पद आहे, असे ग्राहक दिनेश गौतम यांनी नमूद केले.

आजच्या काळात प्रामाणिकपणा दुर्मिळ झाला आहे; आमच्या कर्मचाऱ्याचा आम्हाला अभिमान आहे, असे लॉज मालक योगेश्वर राऊत यांनी सांगितले.

## नशिबाची परिक्षा

**सोमवार दि .१३ एप्रिल २०२६**

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | सिंगल ५-१-९ मजबुत | जोड |
|---|---|---|---|
| १९० २३० २४४ | ०-१ | १२८ १४६ १०० | ०७-६१-२३ ८४-१९ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | सिंगल ९-४-५ मजबुत | जोड |
|---|---|---|---|
| १२० ४९० ६७० | ३-८ | १२५ २६० ४४० | ३१-६८-२९ ४०-८५ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | सिंगल ४-७-९ मजबुत | जोड |
|---|---|---|---|
| १२६ ४५० १४४ | ९-२ | १५६ २४६ २२८ | ९०-४२-१५ ८७-२६ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |
| 26/01/2026 to 30/01/2026 | *** ** *** | 120 30 118 | 679 23 346 | 134 83 247 | 249 52 138 |
| 02/02/2026 to 06/02/2026 | 129 28 170 | 249 55 780 | 570 20 677 | 377 73 247 | 134 87 458 |
| 09/02/2026 to 13/02/2026 | 378 82 778 | 126 93 157 | 679 22 570 | 139 34 400 | 689 30 145 |
| 16/02/2026 to 20/02/2026 | 347 46 358 | 156 29 568 | 779 38 233 | 126 92 246 | 123 65 456 |
| 23/02/2026 to 27/02/2026 | 250 76 457 | 229 39 469 | 266 48 170 | 168 53 580 | 145 09 568 |
| 02/03/2026 to 06/03/2026 | 130 47 269 | 244 03 247 | *** ** *** | 257 48 279 | 466 65 249 |
| 09/03/2026 to 13/03/2026 | 236 16 240 | 168 56 880 | 578 05 889 | 248 43 148 | 334 09 135 |
| 16/03/2026 to 20/03/2026 | 456 56 899 | 200 21 380 | 460 02 499 | 127 02 138 | 670 38 378 |
| 23/03/2026 to 27/03/2026 | 689 34 356 | 455 46 178 | 569 03 788 | 130 46 240 | 330 64 167 |
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

# श्रीगोंदा तालुक्यात जलसंधारण कामांचा शुभारंभ

## १०० कोटी लिटर पाणीसाठा वाढवण्याचा संकल्प

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : पाणी वाचवा म्हणजे भविष्य वाचवा ही घोषणा आता फक्त बॅनरवर नाही, तर थेट मैदानात उतरली आहे! श्रीगोंदा तालुक्यातील कोळगाव, कोथूळ व चिखली येथे जलसंधारणाच्या महत्त्वपूर्ण कामांचा शुभारंभ करण्यात आला असून, या उपक्रमातून तब्बल १०० कोटी लिटर पाणीसाठा वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

राह फाउंडेशन चे संस्थापक गिरीश कुलकर्णी व डॉ. सारिका गिरीश कुलकर्णी यांच्या पुढाकारातून तलाव गाळमुक्ती व खोलीकरणाच्या कामांना



प्रारंभ झाला. सामाजिक बांधिलकी जपत, कोणत्याही सी एस आर निधीचा वापर न करता हा उपक्रम स्वखर्चातून राबविण्यात येत असल्याने विशेष कौतुक होत आहे.

या प्रकल्पामुळे दुहेरी फायदा होणार आहे. तलावातील सुपीक गाळ शेतकऱ्यांना मिळाल्याने जमिनीची सुपीकता वाढणार, तर दुसरीकडे पाणीसाठा वाढून पाणीटंचाईवरही मोठा दिलासा मिळणार आहे. सध्या कोळगाव (जुनीवाडी, वेठेकरवाडी), कोथूळ व चिखली येथे गाळ काढण्याचे काम वेगाने सुरू असून, पोकलेन, हायवा व ट्रॅक्टरच्या सहाय्याने ही मोहीम राबवली जात आहे. यांत्रिक सहकार्य करणारे बंडू कवडे यांनी याबाबत माहिती दिली.

या कामाच्या शुभारंभप्रसंगी कोळगावचे सरपंच पुरुषोत्तम लगड, माजी उपसभापती बाळासाहेब नलगे, कोथूळचे सोसायटी चेअरमन धनंजय लाटे, चिखलीचे सरपंच कुलदीप कदम व मार्केट कमिटीचे संचालक रामदास झेंडे यांची उपस्थिती होती. तीनही गावांतील शेतकरी, कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### पाण्यासाठी लढा, विकासासाठी वाटचाल

गेल्या पंधरा वर्षांपासून गिरीश कुलकर्णी व त्यांच्या कुटुंबाकडून महाराष्ट्रात विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. वृक्षलागवड, शेतीविकास आणि पर्यावरण संवर्धनात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. यंदा अहिल्यानगर जिल्ह्यात पारनेर व परिसरात १०० कोटी लिटर पाणीसाठा वाढवण्याचे उद्दिष्ट असून, मागील दोन वर्षांत तब्बल ३०० कोटी लिटर पाणीसाठा वाढवण्याचे काम पूर्ण झाले आहे.

## द•ख•ल

### दिगंबर नलगे यांना पीएच.डी प्रदान



**श्रीगोंदा** : मेहनत, अभ्यास आणि जमिनीशी नाळ जुळलेला दृष्टिकोन याच्या बळावर दिगंबर नलगे यांनी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. भाऊसाहेब संतुजी थोरात महाविद्यालय, संगमनेर येथील अर्थशास्त्र संशोधन केंद्रातील विद्यार्थी दिगंबर नलगे यांना दिनांक ११ एप्रिल रोजी पीएच.डी पदवी प्रदान करण्यात आली. नलगे यांनी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विक्रीसाठी येणाऱ्या शेतमालाच्या किमती व उत्पादन खर्चाचा तुलनात्मक अभ्यास या विषयावर संशोधन पूर्ण केले. हा प्रबंध सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे येथे सादर करण्यात आला होता. जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालयाचे प्रा. डॉ. संभाजी काळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हा अभ्यास केला.बाह्य परीक्षकांचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर नलगे यांची तोंडी परीक्षा यशस्वीरीत्या पार पडली आणि त्यांना पीएच.डी पदवी बहाल करण्यात आली. या संशोधन कार्यात प्रा. डॉ. सुहास आव्हाड, डॉ. प्रमोदिनी कदम व प्रा. वाळुंज यांचे सहकार्य लाभले.

### 'कवी कट्टा'साठी कविता पाठविण्याचे आवाहन

**अहिल्यानगर** : सतराव्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात येणाऱ्या खुल्या काव्य संमेलनासाठी (कवी कट्टा) नवोदित कवींकडून कविता मागविण्यात येत आहेत. नवोदित कवींनी आपल्या दोन स्वरचित कविता कवी कट्टा साठी पाठवाव्यात, असे आवाहन शब्दगंध साहित्यिक परिषदच्या राज्य कार्यकारिणी सदस्य कवयित्री शर्मिला गोसावी व सहसचिव स्वाती ठुबे यांनी केले आहे. शब्दगंध साहित्यिक परिषदेची महत्त्वपूर्ण बैठक नुकतीच अहिल्यानगर येथील जाधव लॉन्स येथे अध्यक्ष राजेंद्र उदागे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत कवी कट्टा उपक्रमासाठी कविता मागविण्याचा निर्णय घेण्यात आला. येत्या २३ मे रोजी होणाऱ्या कवी कट्टा साठी इच्छुकांनी आपल्या दोन स्वरचित कविता, संक्षिप्त परिचय, छायाचित्र तसेच पोस्टाची पाच रुपयांची पाच तिकिटे शब्दगंध साहित्यिक परिषद, फुलोरा, लक्ष्मी कॉलनी, भिस्तबाग महालाजवळ, तपोवन रोड, सावेडी, अहिल्यानगर - ४१४००३ येथे पाठवावे असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# काष्टी यात्रेत कुस्त्यांचा जंगी आखाडा रंगला

## दादासाहेब कोकाटे यांच्या हस्ते मानाची कुस्ती ट्रॉफी प्रदान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लिंपणगाव** : काष्टी येथील भैरवनाथ यात्रोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या भव्य जंगी आखाड्याला यंदा मोठा प्रतिसाद मिळाला. विविध भागातील नामांकित मल्लांनी सहभाग नोंदवत रंगतदार कुस्त्यांचा थरार अनुभवायला मिळाला. या आखाड्यात ग्रामपंचायत सदस्य दादासाहेब कोकाटे यांच्या तर्फे मानाच्या कुस्तीच्या विजेत्याला आकर्षक ट्रॉफी प्रदान करण्यात आली. या वेळी उपस्थित ग्रामस्थांनी जल्लोष करत विजेत्या मल्लाचे अभिनंदन केले. आखाड्यातील कुस्त्यांनी प्रेक्षकांची उत्सुकता शिगेला पोहोचवली होती.

कार्यक्रमात विविध वजन गटांमध्ये कुस्त्यांचे सामने रंगले. अनुभवी तसेच युवा मल्लांनी आपली ताकद आणि कौशल्य दाखवत प्रेक्षकांची मने जिंकली. अंतिम मानाची कुस्ती विशेष आकर्षण ठरली. यावेळी दादासाहेब कोकाटे यांनी बोलताना पारंपरिक खेळांना प्रोत्साहन देणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. ग्रामीण भागातील कुस्ती संस्कृती जपण्यासाठी अशा आखाड्यांचे आयोजन महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे आयोजन ग्रामस्थ व युवक मंडळाच्या वतीने करण्यात आले होते. यात्रेनिमित्त गावात उत्साहाचे वातावरण असून विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांनी वातावरण भारावून गेले आहे.

यावेळी श्रीगोंदा-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार विक्रमसिंह पाचपुते, श्रीगोंदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक दीपक पाटील भोसले, काष्टी गावचे सरपंच साजन पाचपुते, वस्ताद अन्सार पठाण, जालिंदर पाचपुते, विशाल भोसले यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेवगावात महात्मा ज्योतिबा व सावित्रीबाई फुले भव्य स्मारक उभारणार

## नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेत एकमताने ठराव मंजूर : नगरसेविका आशा बुलबुले

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव** : शहरातील नवीन बाजारतळ येथील भाजी मंडईत महात्मा ज्योतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक उभारणी करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शेवगाव नगर परिषदेच्या सर्वसाधारण सभेत एकमताने घेण्यात आला. या निर्णयामुळे शहरातील अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेली मागणी अखेर मार्गी लागली असून सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात मोठे प्रतीकात्मक महत्त्व असलेले भव्य स्मारक उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

नवीन बाजारतळ येथील भाजी मंडई परिसरात महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक उभारावेत यासाठी नगरसेविका आशा खंडेराव बुलबुले यांनी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा केला



होता. या संदर्भात त्यांनी विविध बैठका घेतल्या, प्रशासनाशी पत्रव्यवहार केला तसेच नगर परिषद स्तरावर विषय प्रभावीपणे मांडला. अखेर सर्वसाधारण सभेत ठराव मांडण्यात येऊन तो एकमताने मंजूर झाला. या स्मारकासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी आमदार मोनिका राजळे यांच्याकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. पुतळा उभारणीसाठी निधी देण्याचे आश्वासन आमदार मोनिका राजळे यांनी दिल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची शक्यता व्यक्त होत आहे आहेत.

शहरात महात्मा जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले भव्य स्मारक उभारावे ही मागणी अनेक वर्षांपासून होत होती. सामाजिक समता, स्त्री शिक्षण आणि शेतकरी हक्कांसाठी आयुष्य वेचलेल्या या महापुरुषांच्या कार्याचा गौरव व्हावा, यासाठी नागरिकांकडून सातत्याने मागणी होत होती. नगरपरिषद स्तरावरही या विषयावर चर्चा होऊन पाठपुरावा करण्यात आला होता. नगरसेविका आशा बुलबुले म्हणाल्या शहरातील सर्वसामान्यांची भावना लक्षात घेऊन हा ठराव मांडण्यात आला. सभागृहाने एकमताने ठराव मंजुरी दिल्याबद्दल अध्यक्ष, उपाध्यक्ष व सभागृहातील सर्व नगरसेवकांचे यावेळी नगरसेविका अशा बुलबुले व ज्योति लिंगे यांनी आभार मानले तसेच आमदार मोनिका राजळे यांनी निधी देण्याचे दिलेले आश्वासन लवकरच प्रत्यक्षात येईल, असा विश्वास आहे.

ठराव मंजूर झाल्यानंतर शहरात समाधानाचे वातावरण असून भव्य स्मारकामुळे उभारल्यानंतर नवीन बाजारतळातील मंडईत ऐतिहासिक महत्त्व अधिक अधोरेखित होणार आहे. तसेच भावी पिढ्यांसाठी प्रेरणास्थान ठरणारे हे स्मारक ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.महात्मा ज्योतिबा फुले पुतळा कृती समितीचे समितीचे अध्यक्ष खंडु बुलबुले, शिवाजी आधट, बाळासाहेब शिंत्रे, अँड कारभारी गांलडे पांडुरंग लिंगे, दिपक नांगरे, अनिकेत डाके, शुभम नांगरे, सचिन नांगरे, सोपान आधट, विशाल आधट, रोहित नांगरे, सचिन डाके, लक्ष्मण लिंगे, सागर आधट, प्रजोत डाके, राहुल नांगरे, आकाश डाके, अक्षय भडके, ओमकार सुसे, हरी नांगरे , देवीदास डाके आदी कार्यकर्ते प्रयत्नशील आहेत.

# 'धर्मवीर आनंद दिघे नागरी सहायता कक्ष' मार्फत शेवगावमध्ये ६४ शाखाप्रमुखांना विशेष प्रशिक्षण



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव** : सामान्य नागरिकांना केंद्र व राज्य सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजनांचा लाभ विनासायास मिळावा आणि प्रशासकीय प्रक्रियेतील अडथळे दूर व्हावेत, या उद्देशाने हर्षदा काकडे यांच्या पुढाकाराने शेवगाव येथे 'धर्मवीर आनंद दिघे नागरी सहायता कक्ष' कार्यान्वित करण्यात आला आहे. अहमदनगर जिल्ह्यातील अशा प्रकारचा हा पहिलाच कक्ष असून, या उपक्रमाचा एक भाग म्हणून काल (दि.११) रोजी तालुक्यातील ६४ शाखाप्रमुख आणि उपप्रमुखांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत ठाणे येथून आलेले विशेष प्रशिक्षक मयूर कदम यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत शासन योजनांची अंमलबजावणी तळागाळापर्यंत कशी करावी, याचे सखोल धडे दिले.

या प्रशिक्षण कार्यशाळेत प्रामुख्याने आरोग्य, शिक्षण आणि आर्थिक सक्षमीकरणावर भर देण्यात आला. त्यासाठीच्या शासकीय योजना व त्यांचे तांत्रिक मार्गदर्शन मयूर कदम यांनी केले. तसेच, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी सायकल व टॅब मिळवणे, सामान्यांना घरकुल व घर दुरुस्तीसाठी निधी मिळवून देणे, नवीन मतदान ओळखपत्रांसाठी आणि प्रवासासाठी एसटी बस सवलत कार्ड उपलब्ध करून देणे, अशा सामान्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत बाबींवर कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करण्यात आले. महिलांच्या सक्षमीकरणासाठी अत्यंत महत्त्वाच्या ठरणाऱ्या 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेची केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे आणि 'विश्वकर्मा' योजनेचा लाभ प्रत्येक गरजू कारागिरांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रत्यक्ष अर्जाची प्रक्रिया कशी पूर्ण करावी, याचे प्रात्यक्षिक यावेळी दाखवण्यात आले.

यासोबतच, प्रत्येक समाजाच्या महामंडळांमार्फत उपलब्ध असलेल्या कर्जाच्या योजना आणि छोट्या व्यावसायिकांसाठीच्या 'पीएम स्वनिधी' योजनेतून गरजूंच्या व्यवसायाला कसा हातभार लावता येईल, यावरही सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. गावखेड्यातील सामान्य नागरिक केवळ कागदपत्रांच्या माहितीअभावी लाभापासून वंचित राहू नये, यासाठी प्रशिक्षित कार्यकर्त्यांची ही फळी आता गावोगावी सक्रिय होणार आहे. याप्रसंगी शिवसेनेचे ज्येष्ठ नेते ड. शिवाजीराव काकडे, उपजिल्हाप्रमुख दिलीप भागवत, उपजिल्हाप्रमुख अंकुश चितळे, राम पोटफोडे, लक्ष्मण गवळी, भारत लांडे, नवनाथ खेडकर, भारत भालेराव, पृथ्वीसिंह काकडे, वैभव पूरनाळे, परमेश्वर तांबे, सुनिल गायके, रामनाथ भालेराव, अमोल टेकाळे, राज भुसे, बाळासाहेब मडके यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

*गाव-खेड्यातील सर्वसामान्य माणूस कागदपत्रांच्या तांत्रिक अडचणींमुळे सरकारी लाभापासून वंचित राहतो. हे चित्र बदलण्यासाठीच या सहायता कक्षाची स्थापना करण्यात आली असून, प्रशिक्षित कार्यकर्ते आता थेट जनतेच्या दारात जाऊन सेवा देतील असा विश्वास आहे. ॲड.शिवाजीराव काकडे, शिवसेना नेते, अहिल्यानगर. दरम्यान, शासन योजनांची अत्यंत सोप्या भाषेत आणि सखोल माहिती मिळाल्याने, या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे उपस्थितांमधून आणि तालुकाभरातून कौतुक केले जात आहे.*


# कर्जत ४० अंश सेल्सिअस

## उन्हाच्या तडाख्याने शहरातील रस्त्यावर अघोषित संचारबंदी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत** : यंदा मार्च महिन्यापासूनच उन्हाचा तडाखा चांगला जाणवत असून मागील दोन-तीन दिवसांपासून कर्जत शहर आणि तालुक्यात बहुतांश ठिकाणी वाढत्या उन्हाच्या पाऱ्याने दुपारी १२ पासूनच रस्त्यावर अघोषित संचारबंदी जाणवत आहे. कर्जत शहरात उन्हाने चाळीशी गाठली यामुळे उष्मांघाताचे देखील प्रमाण वाढत असल्याने सर्वसामान्य नागरिकांनी विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन आरोग्य विभागाकडून करण्यात येत आहे. प्रशासकीय पातळीवर देखील प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी गावनिहाय टंचाई आढावा घेण्याच्या सूचना तालुका प्रशासनास दिल्या आहेत. यंदा उन्हाची तीव्रता मार्च मध्यानापासूनच सर्वाधिक जाणवत आहे.

वातावरणातील कमालीच्या बदलामुळे एप्रिल महिन्यात उन्हाची तीव्रता आणि दाहकता वाढली आहे. कर्जत शहराचे तापमान जवळपास ४० अंश सेल्शियशच्या आसपास गेल्याने दुपारी १२ नंतर अनेक ठिकाणी शुकशुकाट जाणवत आहे. सर्वसामान्य नागरिक वाढत्या उन्हामुळे घराबाहेर पडताना दिसत नाही. यामुळे दुपारी १ ते ४ पर्यंत शहरासह ग्रामीण भागात देखील व्यवहार बंद ठेवले जात आहे. विद्यार्थ्यांच्या शाळेच्या



मागील वर्षी अवकाळी आणि मान्सून पावसाने कर्जत तालुक्यात जोरदार हजेरी लावली. यामुळे नैसर्गिक पाण्याचे जलस्त्रोतात पाण्याची पातळी प्रमाण चांगले आहे. मात्र सध्याच्या उन्हाच्या वाढत्या तापमानाने त्यात घट होऊ शकते. या अनुषंगाने कर्जतचे प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी तालुका प्रशासनास जल व्यवस्थापनाबाबत अलर्ट राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. यासह अवैध आणि अनधिकृत पाणी उपसा करणाऱ्यावर करडी नजर ठेवत उचित कार्यवाहीचे निर्देश दिले आहे.

वेळेत देखील शाळा प्रशासनाने बदल केला आहे. वाढत्या उन्हामुळे उष्मांघाताचे प्रमाण वाढले असून विशेष करून लहान बालक आणि जेष्ठ नागरिकांनी खबरदारी घेणे अनिवार्य आहे. गारवा निर्माण करण्यासाठी वातानुकूलित यंत्र, एसी, कुलर साधनांची मागणी वाढली आहे. यासह थंड पेयाची दुकाने सजली असून कुटुंबासह संध्याकाळी फिरणे पसंत करीत आहे. शक्यतो उन्हात फिरणे, प्रवास करणे टाळावे. महत्वाचे काम असल्यास, शेतीचे कष्टाचे काम करताना अंगात सुती कापडे यासह डोळ्यास गॉगल, डोक्यात टोपी, उपरणे अथवा स्कार्फ बांधणे आवश्यक आहे.

या काळात भरपूर पाणी पिणे योग्य असून तेलकट पदार्थ, तिखट खाणे टाळावे. डी हायड्रेशन जाणवत असल्यास लिंबू सरबत प्यावे असे वैद्यकीय अधिकारी सल्ला देत आहे. लघवीला जळजळ होणे, उन्हाळी लागणे यावर तात्काळ वैद्यकीय उपचार घ्यावे असे आवाहन वैद्यकीय अधिकारी यांनी केले.

# डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त दळवी परिवाराकडून अन्नदान



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव** : महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून नेवासा तालुक्यातील अक्षय ग्रामिण युवा क्रिडा व सामाजिक विकास संस्था संचलित, शरणपूर वृध्दाश्रम फत्तेपूर (यशवंतनगर) ता. नेवासा, जि. अहिल्यानगर या ठिकाणी सामाजिक कार्यकर्ते सालवडगाव तालुका शेवगाव चे सुपुत्र नितीन दळवी व सचिन दळवी यांनी एक दिवसाचे भोजन दान दिले. यावेळी मान्यवरांच हस्ते या तसेच वृद्धाश्रमातील वृद्ध व्यक्तींच्या हस्ते महामानवाच्या प्रतिमेचे पूजन व या ठिकाणी त्रिशरण पंचशील घेऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. दळवी बंधूंनी जयंती निमित्त काहीतरी आगळं वेगळं करण्याचा प्रयत्न केला आहे. भुकेल्याना मुखी घास जावा यासाठी या वृध्दाश्रमात गेल्या दहा वर्षांपासून तीस वृध्द महिला व पुरुष राहत असलेल्या वृद्धांना अन्नदान केले. या संस्थेचे संस्थापक रावसाहेब मगर व त्याची पत्नी, मुलगा, सुन, नातू हे देखभाल करत आहेत. या कार्यक्रम प्रसंगी विक्रम बल्लाळ यांनी तथागत गौतम बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार सांगितले व बौद्धाचार्य संतोष पटवेकर गुरुजी यांनी समाजातील होणाऱ्या घटकावर मार्गदर्शन केले. भारतीय बौद्ध महासभेचे विलास खंडागळे, बौद्धाचार्य संतोष पटवेकर, शहादेव निळ, वसंत दळवी, सुनील पटेकर, सुधाकर दळवी, राहुल सूर्यवंशी, नवीद पटेल, मंदा दळवी, नंदा पहिलवान, प्रियांका दळवी व दळवी परिवार तसेच वृध्दाश्रमातील कर्मचारी ज्योती मगर, संतोष मगर या प्रसंगी उपस्थिती होते.

# मोफत दंतरोग तपासणी शिबिरास उस्फूर्त प्रतिसाद

## आनंदऋषीजी हॉस्पिटल महाराष्ट्राच्या आरोग्यसेवेचे केंद्र-वसंत लोढा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : सध्या रुग्णसेवा ही फार महागडी अशी व्यवस्था झालेली आहे.सर्वसामान्यांना परवडेल अशा प्रकारची चांगली वैद्यकीय सेवा पुरविण्याचे काम प.पु.आनंदऋषीजी म.सा. यांच्या आशीर्वादाने होत आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटल हे नगर शहरातीलच नव्हे. तर संपूर्ण महाराष्ट्राचे आरोग्यसेवेचे केंद्र बनले आहे. आनंदऋषीजी हॉस्पिटल मधील सर्व डॉक्टर्स, नर्सेस व स्टाफ अत्यंत आपुलकीने रुग्णसेवा करीत आहेत.

जैन सोशल फेडरेशनने शिबिराच्या माध्यमातून लोढा परिवाराला रुग्ण सेवा करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. या पुढील काळात पंडित दीनदयाळ पतसंस्थेच्या वतीने पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त शिबिर घेण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवा कार्या साठी लोढा परिवाराचे सदैव सहकार्य मिळेल, असे प्रतिपादन पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे



संस्थापक वसंत लोढा यांनी केले. जैन सोशल फेडरेशन संचलित आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये स्वर्गीय हस्तीमल मूळचंद लोढा यांच्या स्मृतिदिनानिमित्त वसंत, पारस, पोपट लोढा व लोढा परिवाराच्या वतीने आयोजित मोफत दंतरोग तपासणी शिबिराचे उद्घाटन पंडित दीनदयाळ पतसंस्थेचे संस्थापक वसंत लोढा, उद्योजक पारस लोढा, सामाजिक कार्यकर्ते पोपट लोढा यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आले.

याप्रसंगी माजी नगराध्यक्ष लता लोढा, शांतीलाल लोढा, संतोष लोढा, विशाल गणेश देवस्थानचे विश्वस्त अशोक कानडे, बबनराव गोरे, सुप्रिया लोढा, उषा लोढा, मीना लोढा, कोमल लोढा, जागृती लोढा, चैताली गोलेचा, अभय पुंगलिया, मनसुख संचेती, कीर्ती बोगावत, पवन बोगावात आदींसह जैन सोशल फेडरेशनचे संतोष बोथरा, डॉ.वसंत कटारिया,सतीश लोढा,माणकचंद कटारिया, प्रकाश छल्लाणी,पियुष मंडलेचा शिबिराचे तज्ञ डॉ.अर्पणा पवार, डॉ. स्वराज ढोले आदी उपस्थित होते. अशोक कानडे म्हणाले, वसंत लोढा यांनी पतसंस्थेच्या माध्यमातून गोरगरीब आणि गरजूंना नेहमीच मदत केली आहे. दीनदयाळ परिवाराच्या माध्यमातून समाज प्रबोधनही केले जाते. तसेच शहराच्या जडणघडणीत लोढा परिवाराचे योगदान सातत्याने लाभत आहे. आरोग्य शिबिराच्या माध्यमातून लोढा परिवाराने केलेले रुग्णसेवेचे कार्य कौतुकास्पद आहे. डॉ.अर्पणा पवार म्हणाले, सोमवार ते शनिवार आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये दंतरोग विभागाची ओपीडी सुरू आहे. या विभागामार्फत आत्याधुनिक पद्धतीने मशीनरी च्या साह्याने चांगल्या पद्धतीने उपचार केले जातात. तसेच अत्यल्प दरात दात काढणे, मेटल कॅप, सिरॅमिक कॅप, रूट कॅनल,दातांची कवळी बसवणे, दातांमध्ये सिमेंट भरणे, इम्प्लांट आदी सुविधा येथे उपलब्ध आहेत. प्रास्ताविक संतोष बोथरा यांनी केले.

या शिबिरात १२२ रुग्णांची मोफत दंतरोग तपासणी करण्यात आली. या शिबिरासाठी जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या विविध भागातून रुग्ण आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. वसंत कटारिया यांनी केले तर आभार प्रकाश छल्लाणी यांनी मानले.

# ‘बारामती’मध्ये सुनेत्रा अजित पवार यांना शिवसंग्रामचा पाठिंबा : डॉ. ज्योती मेटे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पुणे:** स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी व अकाली निधनानंतर संपूर्ण महाराष्ट्रात शोककळा पसरली असून, त्यांच्या जाण्याने राजकीय व सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत बारामती विधानसभेच्या पोटनिवडणुकीत सुनेत्रा अजित पवार या उमेदवार असून, शिवसंग्राम पक्षाचा त्यांना पाठिंबा देणार आहे, अशी घोषणा शिवसंग्रामच्या अध्यक्षा डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी पुण्यात पत्रकार परिषद घेऊन केली. बारामतीच्या पोटनिवडणुकीत शिवसंग्राम सक्रिय प्रचारात सहभागी होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी सांगितले की, स्वर्गीय अजितदादा पवार आणि स्वर्गीय विनायकराव मेटे यांच्यातील ऋणानुबंध हे केवळ राजकीय नव्हते, तर वैचारिक आणि सामाजिक पातळीवरही अतूट होते. त्या नात्याचा मान राखत शिवसंग्रामकडून हा पाठिंबा देण्यात येत आहे. महाराष्ट्राची परंपरा ही सहानुभूती, बांधिलकी आणि सामाजिक ऐक्याची आहे. एखाद्या लोकनेत्याच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची संस्कृती महाराष्ट्राने नेहमीच जपली आहे. याच परंपरेचा आदर राखत, शिव, शाहू, फुले आणि आंबेडकर यांच्या पुरोगामी विचारांवर चालणाऱ्या अजितदादांच्या कुटुंबीयांना साथ देणे हे संपूर्ण समाजाचे कर्तव्य असल्याचे त्यांनी नमूद केले.

राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षपदासाठी नावाची चर्चा असल्याबाबत विचारल्यावर त्या म्हणाल्या, प्रशासकीय अधिकारी म्हणून मी अनेक वर्षे काम केले आहे. त्यामुळे ही जबाबदारी सांभाळण्याची क्षमता माझ्यात आहे. भविष्यात संधी मिळाल्यास महिला आयोगाच्या अध्यक्षपदावर काम करण्याची इच्छा आहे. त्यासाठी काही राजकीय निर्णय घ्यावा लागला, तर तो त्या परिस्थितीला अनुसरून घेतला जाईल.''

विनायकराव मेटे यांच्या निधनानंतर पक्ष टिकवून ठेवण्यात यश मिळाले असून, पुढील काळात संघटन अधिक मजबूत करण्यावर भर देणार आहे. करुणा मुंडे संविधानाने दिलेल्या अधिकारात निवडणूक लढत असल्या, तरी नैतिकतेच्या आधारे निर्णय घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात अशोक खरात सारख्या महिला अत्याचाराच्या घटना दुर्दैवी आहे. या प्रकरणाची चौकशी एसआयटीमार्फत होत आहे. मात्र, यामध्ये कोणी राजकारण करू नये, असेही त्यांनी स्पष्ट केले. 'एनसीईआरटी'च्या पुस्तकातून मराठा साम्राज्याचा गौरवशाली इतिहास पुसणे ही अत्यंत गंभीर आणि आक्षेपार्ह घटना असल्याचे त्या म्हणाल्या.

## द•ख•ल

## होळ गावची यात्रा यंदा साध्या पद्धतीने होणार साजरा

**बारामती :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली निधनाच्या घटनेमुळे बारामती तालुक्यातील मौजे होळ येथील श्री भैरवनाथ यात्रा उत्सव अत्यंत साध्या पद्धतीने व फक्त धार्मिक विधी पार पाडून साजरा करण्याचा निर्णय ग्रामस्थ,ग्रामपंचायत व यात्रा कमिटी यांच्यात झालेल्या संयुक्त बैठकीत एकमताने घेण्यात आला आहे. राज्याचे दिवंगत नेते अजित पवार यांच्या निधनामुळे निर्माण झालेली पोकळी कधीच भरून निघणार नाही. त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करण्यासाठी व त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी यंदा सर्व ग्रामस्थांनी एकत्र येत एकमताने उत्सवातील जल्लोष टाळत यंदाच्या वर्षीची यात्रा अत्यंत साध्या पद्धतीने करण्याचा निर्णय घेण्यात आला. यामध्ये आतिषबाजी डीजे यांना फाटा देत रात्रीचा व दिवसाचा तमाशा व कुस्त्या रद्द करत ग्रामस्थांमध्ये श्रद्धा व परंपरा जपत संयमित वातावरणात देवाचा अभिषेक,लग्न विधी व पालखी मिरवणूक हे धार्मिक विधी पारंपारिक पद्धतीने होतील. तसेच होळ गावातील वायाळ पट्टा येथील श्री हनुमान जन्मोत्सव निमित्ताची यात्रा ही रद्द करण्यात आली आहे.त्याच अनुषंगाने होळ कांबळे वस्ती येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जयंतीच्या महोत्सव निमित्ताने प्रतिमापूजन व महाप्रसाद हे उत्सवाचे कार्यक्रम साजरे केले जाणार आहेत. परंतु मिरवणूक व ऑर्केस्ट्रा कार्यक्रम रद्द करण्यात आली असल्याची माहिती यात्रा कमिटी होळ यानी दिली.

## मंगलप्रसाद लोढा यांची दिवे येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत भेट

**दिवे :** दिवे येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) येथे आज महाराष्ट्र राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मा. मंगल प्रभात लोढा यांनी भेट देऊन संस्थेच्या कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी भाजपा नेते मा. बाबाराजे जाधवराव यांनी मंत्री महोदयांचे स्वागत केले. तसेच आयटीआयमध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध नाविन्यपूर्ण ट्रेड सुरू करावेत आणि प्रवेशासाठी अधिकाधिक जागा (सीट्स) उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी त्यांनी केली. या मागणीची दखल घेत मंत्री लोढा यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ आवश्यक कार्यवाही करण्याचे आदेश दिले. पुढील शैक्षणिक वर्षापासून नवीन ट्रेड सुरू करून विद्यार्थ्यांना वाढीव संधी उपलब्ध करून दिल्या जातील, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले. मंत्री महोदयांच्या या निर्णयामुळे पुरंदर तालुक्यातील विद्यार्थ्यांना कौशल्याधारित शिक्षणाच्या अधिक संधी उपलब्ध होणार असून स्थानिक तरुणांना रोजगाराच्या नव्या वाटा खुल्या होणार आहेत.




दिवे ता. पुरंदर येथे मंगलप्रसाद लोढा यांचे स्वागत करताना बाबासाहेब जाधवराव

## दिवे गावच्या आखाड्यात २२० मल्लांची हजेरी

**दिवे :** दिवे येथील ग्रामदैवत श्री कातोबानाथ महाराजांची यात्रा शुक्रवार व शनिवार या दोन दिवस उत्साहात साजरी झाली गुरवारि रात्री बारा वाजता कातोबानाथांच्या जन्मोत्सवाने यात्रेची सुरवात झाली शुक्रवारी सकाळपासूनच मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी



दिवे ता. पुरंदर येथे शुभम थौरात व यश काळे यांच्या कुस्तीतील चुरशीचा क्षण

गर्दी केली होती संध्याकाळी विविध गावचे खेळगडि छबिन्यासाठि उपस्तीत होते तर शनिवारी संध्याकाळी निकाली कुस्त्यांचा जंगी आखाडा भरवण्यात आला होता या आखाड्यात ग्रामस्थांनी भरगच्च बक्षीसे देत कुस्त्या लावल्या दिवे गावच्या आखाड्यात महाराष्ट्रातील नामांकित पहिलवान मंडळिंनी हजेरी लावली त्यामुळे आखाडा रंगतदार झाला यावेळि मंदिरातील मखर व आखाडा कमिनीच्या मदतीसाठी कुस्ती लावण्यात आली या कुस्तीला ग्रामस्थांनी सढळ हाताने मदत केली ग्रामस्थांसह तालुक्यातील कुस्तीप्रेमींनी भरगच्च हजेरी लावली होती पैलवान सागर काळे,कबड्डि चाम्पियन प्रकाश पवार,जगन्नाथ मोरे, राजेंद्र गायकवाड, पप्पु काळे, गोरख झेंडे,यांनी पंच म्हणून काम पाहिले यावेळी सभापती अमित झेंडे, पोलीस पाटील बाळासाहेब झेंडे, सरपंच रूपेश राऊत, झेंडेवाडिचे सरपंच अमर झेंडे माजी सरपंच रमेश झेंडे, गुलाब झेंडे, शरद झेंडे, शिवाजी खटाटे,, बबन लडकत,चेअरमन मुरलीधर झेंडे,शंकर झेंडे ,,अविनाश झेंडे,अमित काळे,अजीत गोळे,पोपट झेंडे,, सुधीर झेंडे, व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते गणपत शितकल, रामभाऊ झेंडे, अशोक टिळेकर, सतिश झेंडे यांनी समालोचन केले.

## जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्त शारदानगर येथे जनजागृती कार्यक्रम संपन्न

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** जागतिक ग्राहक हक्क दिनानिमित्ताने तहसील कार्यालय व अखिल भारतीय ग्राहक पंचायत,बारामती यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (१० एप्रिल) रोजी अँग्रीकलचर डेव्हलपमेंट ट्रस्ट शारदानगर येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी पंचायत समिती बारामती गटविकास अधिकारी किशोर माने, अखिल भारतीय ग्राहक पंचायत पुणे जिल्हाध्यक्ष ॲड. तुषार झेंडे पाटील, अखिल भारतीय ग्राहक पंचायत बारामती तालुका अध्यक्ष संजीव बोराटे, बारामती तालुका पुरवठा निरीक्षण अधिकारी तितिक्षा बारापात्रे




यांच्यासह अखिल भारतीय ग्राहक पंचायत, ग्राहक संरक्षण परिषदेचे पदाधिकारी, विद्यार्थी आदी उपस्थित होते.

ॲड. झेंडे पाटील म्हणाले, ‘ग्राहक संरक्षण कायद्याची पार्श्वभूमी, अंमलबजावणी तसेच राष्ट्रीय ग्राहक मंच तक्रार प्रणाली आणि ई-कॉमर्स प्रणाली खरेदी करतांना फसवणूक झाल्यास ग्राहकांना तक्रार करण्याविषयी मार्गदर्शन केले. ऑनलाईन पद्धतीने होणाऱ्या फसवणूकी पासून सर्वांनी सावधानता बाळगावी, असे आवाहन त्यांनी केले.

श्रीमती बारापत्रे यांनी ग्राहकांच्या हक्कांच्या सोबतच विक्रेत्यांचे कर्तव्याबाबत मार्गदर्शन केले. श्री. दिलावर तांबोळी यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राहूल बेलदार व अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे सचिव महेश पवार यांनी केले. प्राचार्य सचिन खलाटे यांनी आभार प्रदर्शन व्यक्त केले.

## विराट हिंदू संमेलनास महिला वर्गाने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** येथील थत्ते मैदानावर सोमवार, दि. १३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनास हिंदू माता, भगिनी, युवतीं व विद्यार्थिनींनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महिला निमंत्रक सौ. देवयाणी केशवकुमार काळे यांनी केले आहे. या संमेलनास श्रीरामपूर तालुक्याचे भूमिपुत्र तसेच श्रीराम मंदिर अयोध्या व श्रीकृष्ण मंदिर मथुराचे मार्गदर्शक प.पू. स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज, सरला बेट गोदाधामचे मठाधिपती ह.भ.प. रामगिरीजी महाराज तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम क्षेत्र संघचालक डॉ. जयंतीभाई भाडेसिया हे प्रमुख मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. संमेलनापूर्वी दुपारी ३ वाजता येथील हनुमान मंदिरापासून मिरवणुकीचेही आयोजन करण्यात आले आहे. श्रीरामपूर शहर, तालुका व परिसरातील महिला वर्गाने एकजुटीने मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सौ. काळे यांनी केले आहे.



## सुप्रिया गावडे यांची सहा. गटविकास अधिकारीपदी निवड; गावात सत्कार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** तालुक्यातील डिग्रस येथील कु. सुप्रिया शिवाजी गावडे हिने लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवत सहाय्यक गटविकास अधिकारी पदासाठी निवड मिळवली आहे. तिच्या यशाबद्दल गावात सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

या प्रसंगी जिल्हा बँकेचे संचालक व युवा नेते अक्षय कर्डिले यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले की, जीवनात कष्ट, त्याग आणि संघर्ष यामुळेच यश संपादन करता येते. सुप्रिया हिने अभ्यासात सातत्य ठेवून हे यश मिळवले असून तिचा हा प्रवास इतरांसाठी प्रेरणादायी आहे.

कु. सुप्रिया गावडे हिने यापूर्वी कक्षाधिकारी, विक्रीकर निरीक्षक, सहाय्यक गटविकास अधिकारी व दुय्यम निबंधक वर्ग-१ अशा विविध पदांसाठी पात्रता मिळवली आहे. पत्रकार बाळासाहेब दातीर यांची भाची असलेल्या सुप्रियाच्या यशामुळे कुटुंबीयांत आनंदाचे




वातावरण आहे.

कार्यक्रमास माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी उपस्थित राहून सुप्रिया व तिचे वडील शिवाजी गावडे यांचे अभिनंदन केले. यावेळी हभप मनोहर महाराज भोगे यांनीही दोघांचा सत्कार केला.

या कार्यक्रमाला महावितरण अधिकारी धीरज गायकवाड, नितीन मुरकुटे, वैभव गावडे, बाबासाहेब दातीर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हिंदु धर्मा शिवाय जग सुखी होवू शकत नाही : आचार्य महेश व्यास

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**भोकर :** गोमातेचे रक्षण करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. हिंदुधर्म हा एकमेव समानतेचा व बंधुत्वाचा धर्म आहे, म्हणूनच हिंदु धर्मा शिवाय जग सुखी होवू शकत नाही. हिंदुधर्म व गोमाता वाचली तरच आपण अन् जग सुखी होणार आहे. याच हिंदु धर्माच्या रक्षणाकरीता व संत महंताच्या दर्शनरूपी लाभ घेण्याकरीता आज श्रीरामपूर शहरातील थत्ते मैदान येथे होत असलेल्या विराट हिंदु संमेलनास मोठ्या संख्येने उपस्थीत रहा असे आवाहन आचार्य महेशजी व्यास यांनी केले आहे.

श्रीरामपूर तालुक्यातील भोकर येथील श्रीक्षेत्र रेणुकामाता मंदिर येथे नुकत्याच संपन्न झालेल्या बैठकीत उपस्थीतांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. यावेळी येथील विठ्ठल सेवाश्रमाचे मठाधिपती सुदाम महाराज चौधरी, अशोकचे संचालक पुंजाहरी शिंदे, सरपंच शितल पटारे, माजी चेअरमन महेश पटारे, आण्णासाहेब काळे, असंघटीत बांधकाम संघटनेचे गणेश छल्लारे, तंटामुक्त गाव समीतीचे अध्यक्ष रामदास शिंदे, मच्छींद्र पटारे, प्रताप पटारे, संदिप गांधले, सागर अभंग, सतीष शेळके, ज्ञानेश्वर काळे, सागर शिंदे, सुनिल विधाटे, वेणुनाथ डूकरे आदि प्रमुख उपस्थीत होते.

तुम्ही कोणत्याही पक्षात अथवा पाटीत रहा पण जेव्हा हिंदुत्वाचा मुद्दा येईल तेव्हा सर्व राजकीय जोडे बाजूला ठेवून केवळ हिदुत्वासाठी सर्वांनी एकत्र या, हि काळाची गरज आहे. त्यासाठी या विराट हिंदु संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात आज चार वाजता हनुमाण मंदिर रेल्वेस्टेशन येथून शोभा यात्रा निघत आहे. या शोभा यात्रेत श्रीराम मंदिर आयोध्या व श्रीकृष्ण मंदिर मथूराचे सर्वेसर्वा गुरूवर्य स्वामी गोविंददेवगीरी महाराज, श्रीक्षेत्र गोदावरी धाम बेट सरालाचे मठाधिपती महंत गुरूवर्य रामगीरीजी महाराज व राष्ट्रीय स्वयं सेवक संघाचे पश्चाम भारत क्षेत्र संघचालक डॉ. जयंतीभाई भाडेसिया हे सहभागी होत आहे. त्यानंतर थत्ते मैदान येथे विराट हिदु संमेलन व व्याख्यान होणर आहे. या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थीत राहण्याचे आवाहन आचार्य महेश व्यास यांनी केले आहे.

# हातभट्टी दारूविरोधात पोलिसांचा धडाका

## बारामतीत अवैध धंद्यांवर करारी कारवाई!

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** बारामती शहर पोलीस स्टेशन हद्दीत अवैध हातभट्टी दारू व्यवसायावर आळा घालण्यासाठी पोलिसांनी व्यापक, नियोजनबद्ध व प्रभावी मोहीम राबवून सलग धडक कारवाया केल्या आहेत. या कठोर कारवाईमुळे दारू विक्रेत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली असून परिसरात कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट झाली आहे. पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली गुप्त माहितीच्या आधारे गुणवडी, बांदलवाडी, आमराई व परिसरात एकाचवेळी छापेमारी करण्यात आली.

या कारवाईदरम्यान गावठी दारू तयार करण्यासाठी वापरले जाणारे ड्रम,

> अवैध दारू म्हणजे आरोग्य व समाजासाठी गंभीर धोका! आपल्या परिसरात संशयास्पद हालचाली दिसल्यास त्वरित बारामती शहर पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा.
>
> **प्रभारी पोलीस निरीक्षक**
> **बारामती शहर पोलीस स्टेशन**

भांडी व इतर साहित्य जप्त मोठ्या प्रमाणावर तयार दारू हस्तगत जप्त साहित्य व दारू जागीच नष्ट त्यामुळे अवैध व्यवसायावर तात्काळ व प्रभावी आळा बसला आहे. पायी पेट्रोलिंगद्वारे व्यापक मोहीम गेल्या चार दिवसांत पोलिसांनी खालील भागात पायी पेट्रोलिंग करून मोठी कारवाई केली.

गुणवडी, बांदलवाडी, आमराई, पिंपळी, लिमटेक, कसबा, साठेनगर या कारवाईत घरगुती भट्ट्यांचा नायनाट, दारू गाळण्यासाठी वापरण्यात येणारी साधने नष्ट करण्यात येऊन अवैध साठ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात आली. पोलीसांनी केवळ कारवाईच नव्हे तर सामाजिक बांधिलकीही जपली आहे. गावोगावी जनजागृती मोहीम महिला वर्गाशी थेट संवाद दारूबंदी कायद्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अवैध दारूमुळे होणारे आरोग्य व सामाजिक दुष्परिणाम स्पष्ट करण्यात आले.

परंपरागत दारू व्यवसाय करणाऱ्या महिलांचे समुपदेशन करून त्यांना पर्यायी उपजीविकेकडे वळण्याचे आवाहन करण्यात आले. पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी यांनी स्पष्ट इशारा दिला आहे.

अवैध दारू विक्री विरोधातील मोहीम सातत्याने सुरू राहील. कोणताही बेकायदेशीर व्यवसाय आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. नागरिकांनी तत्काळ पोलिसांना माहिती देऊन सहकार्य करावे. स्थानिकांकडून समाधान व्यक्त या कारवाईमुळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, अवैध धंद्यांना आळा बसेल. कायदा व सुव्यवस्था अधिक बळकट होईल.अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

सदर कारवाई ही पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार,पोलीस उपविभागीय अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.कारवाईत सहभागी अधिकारी व अंमलदार पोलीस निरीक्षक श्रीशैल चिवडशेट्टी, पीएसआय भंडारे, पो.हवा. यशवंत पवार, रामचंद्र शिंदे, अभिजीत कांबळे, एएसआय संदीप जाधव, महिला पो.शि. सीमा निंबाळकर, राजश्री जगताप, पो.शि. अमोल देवकाते, अक्षय सिताफ, विशाल शिंदे, विजय ओमासे इत्यादी असून कारवाई करण्यात आली आहे.

## पतसंस्थेची निवडणूक पुढे ढकलण्याची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नाझरे सुपे :** पुणे जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था, पुणे यांच्या निवडणूक प्रक्रियेबाबत सध्या संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, बारामती विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही निवडणूक पुढे ढकलण्याची मागणी जोर धरू लागली आहे. संस्थेचे सभासद व उमेदवार किशोर किसनराव कुलकर्णी तसेच उमाकांत सुरेश सूर्यवंशी यांनी स्वतंत्र निवेदने सादर करून निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे यासंदर्भात मागणी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक ७ मे २०२५ रोजी जाहीर करण्यात आलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार १२ ते १७ मे या कालावधीत नामनिर्देशन अर्ज भरणे, छाननी, माघार, मतदान व निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया निश्चित करण्यात आली होती. मात्र, काही कारणास्तव हा कार्यक्रम पुढे ढकलण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रियेबाबत अनिश्चितता आणि संभ्रम निर्माण झाला आहे.

दरम्यान, बारामती विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यामुळे संबंधित विभागातील अनेक कर्मचारी निवडणूक कामकाजात गुंतले आहेत. विशेषतः प्रशासकीय व इतर शासकीय यंत्रणेत कार्यरत कर्मचारी निवडणूक ड्युटीवर असल्याने त्यांना पतसंस्थेच्या निवडणूक प्रक्रियेत पूर्णपणे सहभागी होता येत नाही. काही कर्मचाऱ्यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले असले तरी त्यांना प्रचार, संपर्क तसेच मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्यास अडचणी येत आहेत.

दोन्ही उमेदवारांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, सध्याच्या परिस्थितीत निवडणूक घेतल्यास अनेक सभासद या प्रक्रियेपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया सर्वसमावेशक व न्याय्य राहण्यासाठी सर्व सभासदांना समान संधी मिळणे आवश्यक आहे. अन्यथा निवडणुकीच्या पारदर्शकतेवर परिणाम होऊ शकतो, अशीही भूमिका त्यांनी मांडली आहे.

यामुळे पतसंस्थेच्या निवडणुकीसाठी निश्चित करण्यात आलेला मतदान दिनांक २४ मे २०२५ ऐवजी पुढील महिन्यात घेण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. यामुळे बारामती तसेच इतर भागातील कर्मचारी व सभासदांना निवडणुकीत सहभागी होण्याची संधी मिळेल, असे त्यांनी नमूद केले आहे.

सध्या या मागण्यांमुळे निवडणूक प्रक्रियेबाबत अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाले असून, निवडणूक निर्णय अधिकारी याबाबत काय भूमिका घेतात, याकडे सर्व संबंधितांचे लक्ष लागले आहे.

## तपासणीपूर्वी लाभ बंद नको – दिव्यांगांना सरसकट मदत द्या

### प्रहार जनशक्ती पक्ष आंबेगाव तालुका अध्यक्ष जितेंद्र भालेराव यांची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**निरगुडसर :** महाराष्ट्र शासनाच्या दिव्यांग संदर्भातील अलीकडील निर्णयामुळे एक गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे दिव्यांगांच्या हक्कांचा खरोखर सन्मान केला जातो आहे का? दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ हा कायदा दिव्यांगांना समान संधी, संरक्षण आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार देतो. याच कायद्यानुसार २१ प्रकारच्या दिव्यांगत्वांचा समावेश करून अधिक व्यापक संरक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

मात्र, शासनाच्या २७ मार्च २०२६ च्या निर्णयामध्ये एक गंभीर विसंगती दिसून येते. एका बाजूला २१ प्रवर्गातील सर्व दिव्यांगांना विविध योजना, सवलती आणि लाभांसाठी पात्र ठरवले जाते, तर दुसऱ्या बाजूला तात्पुरत्या (ढर्शोऑरॲ) दिव्यांगत्व प्रमाणपत्रधारकांना कोणताही लाभ नाकारला जातो. हा विरोधाभास केवळ धोरणात्मक नाही, तर मानवी



संवेदनशीलतेलाही धक्का देणारा आहे. तात्पुरते दिव्यांगत्व म्हणजे त्या व्यक्तीच्या अडचणी तात्पुरत्या असल्या तरी त्या काळात त्यांची गरज कमी होत नाही. उलट, अनेक वेळा अपघात, शस्त्रक्रिया किंवा गंभीर आजारामुळे निर्माण झालेले तात्पुरते दिव्यांगत्व हे अधिक खर्चिक आणि वेदनादायक असते. अशा वेळी शासनाचा आधार काढून घेणे म्हणजे त्या व्यक्तीला दुहेरी संकटात ढकलणे होय.

या निर्णयाचा सर्वात धोकादायक भाग म्हणजेतपासणीपूर्वीच लाभ बंद करण्याची प्रवृत्ती. कोणतीही वैद्यकीय पडताळणी न करता थेट लाभ बंद करणे ही प्रक्रिया अन्यायकारक आणि असंवेदनशील आहे. तपासणीपूर्वी लाभ बंद नको – दिव्यांगांना सरसकट मदत द्या! ही मागणी केवळ भावनिक नाही, तर पूर्णपणे न्याय्य आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ चा मूळ हेतू दिव्यांगांना मुख्य प्रवाहात आणणे, त्यांना सामाजिक आणि आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे हा आहे. पण अशा प्रकारचे निर्णय त्या उद्दिष्टालाच हरताळ फासतात. तात्पुरत्या दिव्यांगांना लाभ नाकारल्याने ते उपचार, पुनर्वसन आणि दैनंदिन गरजा पूर्ण करण्यात अपयशी ठरतात, ज्याचा परिणाम त्यांच्या कुटुंबावरही होतो.

शासनाने घेतलेला हा निर्णय तातडीने पुनर्विचार करण्याची गरज आहे. सर्व दिव्यांग नागरिकांची योग्य आणि पारदर्शक वैद्यकीय तपासणी करूनच लाभाबाबत निर्णय घ्यावा. तोपर्यंत कोणत्याही लाभार्थ्याचा आधार काढून घेऊ नये. विशेषतः तात्पुरत्या दिव्यांगांसाठी स्वतंत्र तरतूद करून त्यांना आवश्यक आर्थिक आणि सामाजिक सहाय्य देणे अत्यावश्यक आहे.

दिव्यांगांचा प्रश्न हा केवळ कागदोपत्री नियमांचा नाही, तर तो माणुसकीचा आणि सामाजिक न्यायाचा आहे. जर शासनानेच त्यांच्या अडचणींकडे डोळेझाक केली, तर त्यांच्या हक्कांचे रक्षण कोण करणार? म्हणूनच आज ठामपणे सांगावे लागेल तपासणीपूर्वी लाभ बंद नको – दिव्यांगांना सरसकट मदत द्या!

दखल

## अक्षय घाणे यांची कर सहाय्यकपदी निवड



**श्रीरामपूर :** राज्य लोकसेवा आयोगाच्या वतीने कर सहाय्यक पदासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत येथील अक्षय सुरेश घाणे या युवकाची निवड झाली आहे. अक्षयचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषदेच्या शाळेत तर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण जे. टी. एस. विद्या संकुलात झाले आहे. तसेच पुढील बी. टेक. इलेक्ट्रॉनिक इंजिनीरिंगचे शिक्षण पुणे येथील विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेकनॉलॉजी येथून पुर्ण केले आहे.या सुयशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## पोलीस महासंचालक सदानंद दाते यांचा सन्मान



**नेवासा :** राज्याचे पोलीस महासंचालक सदानंद दाते यांचा नेवासा येथील भूमिपुत्र व शिवसहकार सेनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष बालेंद्र पोतदार यांच्या हस्ते मुंबईतील त्यांच्या कार्यालयात सन्मान करण्यात आला. यावेळी संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पसायदानाची प्रतिमा भेट देण्यात आली. या भेटीत दाते यांनी नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराजांच्या कर्मभूमीबद्दल आठवणी जाग्या केल्या. विद्यार्थी दशेत सन १९७९ मध्ये नेवासा येथे येऊन 'पैस खांब'चे दर्शन घेतल्याचे त्यांनी सांगितले. पुन्हा एकदा दर्शनासाठी नेवासाला येण्याची इच्छा व्यक्त करत मे महिन्यात भेट देण्याची ग्वाही त्यांनी दिली. या प्रसंगी बालेंद्र पोतदार यांच्यासह त्यांच्या पत्नी मनिषा पोतदार व चिरंजीव इंजिनिअर अथर्व पोतदार उपस्थित होते. पोतदार यांनी नेवासा येथे येण्याचे औपचारिक निमंत्रण देत ज्ञानेश्वरी रचनास्थळ व पैस खांब मंदिरास भेट देण्याचे आवाहन केले. दाते यांनी हे निमंत्रण स्वीकारत नेवासाला पुन्हा भेट देण्याचे आश्वासन दिले. याबद्दल पोतदार यांनी त्यांचे आभार मानले.

## कोपरगावची कन्या स्नेहल आहेर जीएसटी सहाय्यक अधिकारीपदी

**कोपरगाव :** लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत कोपरगावची कन्या कु.स्नेहल अशोक आहेर हिने उत्कृष्ट यश संपादन करत जीएसटी सहाय्यक अधिकारी पदावर नुकतीच नियुक्ती मिळवली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल कु. स्नेहल आहेर तसेच तिचे आई वडील यांचा मा.आ. स्नेहलताताई कोल्हे यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला.कोपरगाव तालुक्यातील रहिवासी असलेल्या स्नेहल आहेर हिने लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होत तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.तिच्या या यशामुळे संपूर्ण कोपरगावकरांमध्ये अभिमानाची भावना निर्माण झाली असल्याचे गौरवोद्गार मा.आ.स्नेहलताताई कोल्हे यांनी सत्कार सोहळ्यात काढले.



## आयआयटी दिल्लीत समता इंटरनॅशनल स्कूलचा तिहेरी विजय

**कोपरगाव :** आयआयटी दिल्ली येथे पार पडलेल्या १० व्या राष्ट्रीय रोबोटिक्स व कोडिंग चॅम्पियनशिपमध्ये समता इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी तिहेरी विजय मिळवत उल्लेखनीय कामगिरी केली. या यशामुळे शाळेचे नाव राष्ट्रीय स्तरावर झळकले आहे.

कोडिंग हॅकॅथॉन प्रकारात प्रज्ञेश सानप, शार्विल गिरवालकर, अवनीश सावला, अनुरूप बजाज, शौनक जोशी व बनित खुराना यांनी प्रथम क्रमांक पटकावत २० हजार रुपयांचे पारितोषिक मिळवले. सॉकर रोबोटिक्स गटात 'सर्किट स्ट्रायकर' संघाने विजेतेपद मिळवले. या संघात ईशान कोयटे व रुद्र राठोड यांचा समावेश होता. त्यांना 'टेकफ्लुएंसर ॲवॉर्ड'नेही गौरविण्यात आले.

लाईन फॉलो रोबोटिक्स स्पर्धेत सुयश शिंदे याने राष्ट्रीय विजेतेपदासह 'टेकफ्लुएंसर ॲवॉर्ड' मिळवत विशेष ठसा उमटवला.

या यशासाठी संगणक शिक्षक उदय पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. संस्थापक ओमप्रकाश कोयटे, कार्यकारी विश्वस्त स्वाती कोयटे व प्राचार्य समीर अत्तार यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले.

या कामगिरीबद्दल शाळा प्रशासनाने विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत भविष्यातही अशाच यशाची अपेक्षा व्यक्त केली आहे.




# श्रीक्षेत्र निघोज येथे भक्तीचा महापूर

## भव्य बगाडगाडा मिरवणूक आणि आंबील वर्तविणे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**पारनेर :** राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या जगप्रसिद्ध रांजण खळगे असणाऱ्या श्रीक्षेत्र निघोज येथील यात्रेला भावी भक्तांनी मोठी गर्दी केली होती. श्री मळगंगा मातेला पारंपारिक पद्धतीने हळद लावत यात्रेला सुरुवात झाली. भव्य ८५ फूट उंच काठीची मोठी मिरवणूक आणि त्यापाठोपाठ आता बगाडगाडा आणि आंबील वर्तवण्यात आले. या नेत्रदीपक सोहळ्याने मळगंगा देवीच्या यात्रेला जणू भक्तीचा महापूर आला होता.

मुख्य यात्रेच्या पहिल्या दिवशी निघोजमधे दिवसभर धार्मिक विधी,काठी मिरवणुक आणि महाप्रसादामुळे संपूर्ण परिसर भक्तीमय झाला होता. दि १० रोजी पहाटे ५ वाजता देवीचा अभिषेक, पूजा-अर्चा आणि महाआरती संपन्न झाली. पूजेचा मान परंपरेनुसार कोळी समाजातील गायखे कुटुंबालाच मिळत असतो. गेली अनेक वर्षांपासून अखंडपणे सुरू असलेली हि सेवा आजसुद्धा तितक्याच निष्ठेने केली जाते. आज पहाटेपासून मंदिरामध्ये भाविकांनी दर्शनासाठीरांगा लावल्या होत्या. मोठ्या संख्येने भावीक भक्त नवस फेडण्या साठी दूरवरून येत असतात.

**लंके कुटुंबाचा बगाडगाडा मिरवणुकीचा मान..**

श्री मळगंगा देवीच्या यात्रेतील मुख्य आकर्षण असणाऱ्या बगाडगाडा मिरवणुकीचा मान लंके कुटुंबाकडे असून, गेल्या अनेक वर्षांपासूनची ही परंपरा त्यांनी अखंडपणे जपली. नवसपूर्तीमुळे या धार्मिक सोहळ्याला वेगळे महत्व प्राप्त झाले आहे. मिरवणुकीत अनेक महिला बगाडगाड्यात बसून देवीसमोर नवस फेडतात. सदर पारंपरिक सोहळ्याचे नेतृत्व जय मल्हार मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक बाबाजी आण्णा लंके, पांडुरंग लंके, आबाजी लंके आणि किसनराव लंके हे करत आहेत. अनेक वर्षाची परंपरा जपत बगाडगाडा सोहळा संपन्न झाला. नव्या पिढीपर्यंत ही परंपरा जपली जाते.

बगाडगाड्याची सवाद्य मिरवणूक आजच्या यात्रेचे मुख्य आकर्षण ठरले. सायंकाळी ५ वाजता नवसपूर्तीसाठी प्रसिद्ध असणाऱ्या बगाडगाड्याची भव्य मिरवणूक मंदिरापासून निघाली होती. पारंपारिक पद्धतीने ढोल-ताशा, टाळ-मृदुंगाच्या गजरात भक्तांनी ''आई मळगंगेच्या नावाचा गजर केला '' मिरवणूकिमधे हजारो भाविक भक्त मोठ्या उत्साहात सहभागी झाले होते.पारंपरिक वेशभूषे मध्ये आलेल्या महिला आणि वारकऱ्यांनी भंडाऱ्याची मुक्त उधळण करत या सोहळ्याची उंची वाढवली.सायंकाळी बरोबर ७ वाजता मिरवणूक हेमाडपंथी बारवेजवळ पोहोचली सोहळ्याची सांगता झाली.

सायंकाळी ७ नंतर भाविकभक्तांनी महाप्रसादाचे सेवन केले.शेकडो क्विंटल अन्न तयार करण्यासाठी आचारी,गावकरी आणि तरुणांनी रातभर जागत सेवा दिली.महाप्रसादासाठी भाविकांनी मोठ्या प्रमाणात देणगी दिली.सुमारे पन्नास हजार भाविकांनी या दिवशी महाप्रसादाचा लाभ घेतला.

बारवेजवळ देवीला अंबीलचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. हजारो महिला भाविकांनी देवीला अंबील वर्तवत आपली श्रद्धा जपली. हे सुद्धा यात्रेचे वैशिष्ट्य मानले जाते. रात्री ८ च्या दरम्यान छबीणा मिरवणूक झाली. संपूर्ण कार्यक्रमात हळदी सोहळा,काठी मिरवणूक आणि बगाडगाड्याचा सोहळा या सर्व घटनांनी मळगंगा देवीच्या यात्रेला रंगत आली. या सोहळ्यामध्ये गावकऱ्यांमधील एकीचे दर्शन दिसून आले. महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.




छाया : दत्ता गाडगे
श्रीक्षेत्र निघोज येथे मळगंगा देवीच्या बगाडगाडा मिरवणुकी मधे भक्तीचा महापूर ..

## नान्नज प्राथमिक आरोग्य केंद्राची १०८ रुग्णवाहिकेला दे धक्क

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**जामखेड :** जामखेड तालुक्यातील नान्नज येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आपत्कालीन सेवेसाठी उपलब्ध असलेली '१०८' रुग्णवाहिका गेल्या अनेक दिवसांपासून वारंवार नादुरुस्त होत असल्याने आरोग्य सेवा पुरती कोलमडली आहे. विशेषतः या रुग्णवाहिकेची बॅटरी खराब झाल्याने ऐन आणीबाणीच्या वेळी गाडी सुरू होत नाही, परिणामी रुग्णांना वेळेत उपचार मिळणे कठीण झाले असून रुग्णवाहिकेला धक्का देऊन चालु करावी लागत असल्याने ग्रामस्थांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

शासनाने ग्रामीण भागातील रुग्णांना तातडीने उपजिल्हा रुग्णालय किंवा शहराच्या ठिकाणी हलवण्यासाठी मोफत १०८ रुग्णवाहिका सेवा सुरू केली आहे. मात्र, नान्नज येथील केंद्रावर असलेली गाडी केवळ बॅटरीच्या तांत्रिक अडचणीमुळे शोभेची वस्तू बनली आहे. अनेकदा अपघात किंवा गंभीर आजारी रुग्णांना नेण्यासाठी फोन केल्यानंतर गाडी वेळेवर उपलब्ध होत नाही. गाडी सुरू करण्यासाठी वारंवार धक्का मारण्याची वेळ चालक व रुग्णांच्या नातेवाईकांवर येत असल्याचे समजते.




नान्नज हे परिसरातील मोठे गाव असून, आजूबाजूच्या वाड्या-वस्त्यांवरील रुग्ण याच प्राथमिक आरोग्य केंद्रावर अवलंबून आहेत. १०८ रुग्णवाहिका वेळेवर मिळत नसल्यामुळे गरिबांना खाजगी वाहनांचा आधार घ्यावा लागत आहे. खाजगी रुग्णवाहिका चालक अव्वाच्या सव्वा भाडे आकारत असल्याने सामान्य रुग्णांच्या खिशाला मोठी कात्री लागत आहे. प्रसूतीसाठी येणाऱ्या महिला आणि अपघातग्रस्तांना या स्थितीचा सर्वाधिक फटका सोसावा लागत आहे.

गाडीच्या बॅटरीबाबत संबंधित विभागाला वारंवार कळवूनही याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. १०८ रुग्णवाहिकेचे व्यवस्थापन पाहणाऱ्या कंपनीने तातडीने याची दखल घेऊन नवीन बॅटरी बसवावी, अशी मागणी जोर धरत आहे.

जर येत्या काही दिवसांत रुग्णवाहिकेची दुरुस्ती होऊन ती पूर्ण क्षमतेने सुरू झाली नाही, तर आरोग्य केंद्रासमोर आंदोलन करण्याचा इशारा नान्नज व परिसरातील सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे. ''एखाद्या रुग्णाचा जीव गेल्यावर प्रशासन जागे होणार का?'' असा संतप्त सवाल ग्रामस्थ विचारत आहेत. आता आरोग्य विभाग आणि १०८ सेवा व्यवस्थापन यावर काय पाऊल उचलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पंडित सुदाम देवळालकर ''महाराष्ट्र भूषण'' पुरस्काराने सन्मानित




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालूक्यातील टाकळीभान येथील पौरोहित्य पंडित सुदाम लक्ष्मीकांत देवळालकर यांना नाशिक येथे आनंदी युनिव्हर्स फाउंडेशनच्या वतीने ''महाराष्ट्र भूषण'' पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले आहे. सुदाम देवळालकर यांनी याज्ञिक व पूजापाठ क्षेत्रात उल्लेखनिय कार्य केले असल्याने त्यांनी केलेल्या कार्याची आनंदी युनिव्हर्स फाउंडेशने दखल घेवून त्यांना ''महाराष्ट्र भूषण'' पुरस्कार देवून सन्मानित केले आहे.नाशिक येथे आनंदी युनिव्हर्स फाउंडेशनच्या वतीने कृतित्ववान व्यक्तींचा सन्मान सोहळा २०२६ आयोजन करण्यात आले होते. यावेळी फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश वीटकर व मराठी चित्रपट अभिनेत्री स्वरा राजपूत यांचे हस्ते सुदाम देवळालकर यांना सन्मानपत्र व स्मृतीचिन्ह देवून गौरविण्यात आले आहे. या पुरस्कारा बद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

## सेवानिवृत्त वाहतूक नियंत्रकाच्या मुलाची टॅक्स असिस्टंटपदी निवड

### पदाचा उपयोग समाजासाठी करावा -खासदार निलेश लंके

**अहिल्यानगर :** एसटी महामंडळातील सेवानिवृत्त वाहतूक नियंत्रक दत्तू शेळके यांचा मुलगा प्रविण शेळके याने महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवत टॅक्स असिस्टंट पदावर निवड मिळवली आहे. त्यांच्या या यशाबद्दल राज्य परिवहन निवृत्त कर्मचारी संघटनेच्या वतीने विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात खासदार निलेश लंके यांच्या हस्ते प्रविण शेळके यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी संघटनेचे माजी जिल्हाध्यक्ष व केंद्रीय कार्यकारिणी सदस्य बलभीम कुबडे, प्रतिनिधी मच्छिंद्र शिंदे, मोहन औटी, आप्पासाहेब सुंबे तसेच दत्तू शेळके यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

खासदार निलेश लंके म्हणाले की, प्रविण शेळके यांचे यश हे केवळ वैयक्तिक नाही, तर समाजासाठी मार्गदर्शक ठरणारे आहे. अत्यंत सामान्य घरातून येऊन त्यांनी ज्या प्रकारे मेहनत आणि जिद्दीने हे स्थान मिळवले आहे, ते खरोखर कौतुकास्पद आहे. आजच्या तरुणांनी त्यांच्या उदाहरणातून प्रेरणा घ्यावी. सरकारी पद हे केवळ नोकरी नसून समाजसेवेचे माध्यम आहे. प्रविण यांनी आपल्या पदाचा उपयोग गोरगरीब, वंचित आणि सर्वसामान्य लोकांच्या हितासाठी करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

बलभीम कुबडे म्हणाले की, दत्तू शेळके यांनी एसटी महामंडळात काम करताना प्रामाणिकपणा आणि निष्ठा यांचे उत्तम उदाहरण घालून दिले. त्यांच्या या गुणांचे प्रतिबिंब त्यांच्या मुलाच्या यशातून स्पष्ट दिसते. प्रविणने कठोर परिश्रम, संयम आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर हे यश मिळवले आहे. आजच्या तरुणांनी मोबाईल व इतर गोष्टींपेक्षा अभ्यासावर लक्ष केंद्रित करून आपले भविष्य घडविण्याचे आवाहन केले.प्रविण शेळके याचे वडिल दत्तू शेळके पारनेर आगारात वाहतूक नियंत्रक म्हणून कार्यरत होते. ते सेवानिवृत्त झाले असून, प्रविण याने अत्यंत साध्या व सर्वसामान्य परिस्थितीतून कठोर परिश्रम आणि चिकाटीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या कामगिरी अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरली आहे. उपस्थित मान्यवरांनीही प्रविण शेळके यांचे अभिनंदन करत त्यांच्या यशामुळे संपूर्ण कर्मचारी वर्गाचा सन्मान वाढल्याचे सांगितले.



## झिरो मधून हिरो बनायचं असेल तर ध्येय मोठे ठेवा : सहा.पोलिस निरिक्षक सुंदरडे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगाव :** प्रत्येकाच्या आयुष्याचा जीवन बदलण्यासाठी एक महत्त्वाचा टप्पा असतो. या टप्प्यापर्यंत पोहोचायचे असेल तर जिद्द चिकाटी व मेहनत ठेवावी लागते. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोच्चतेचे प्रतीक आहे. त्यांना आदर्श ठेवून आपण काम केले पाहिजे. सुरुवातीला सर्वच झिरो असते. मात्र या झिरो मधून हिरो बनण्यासाठी शिक्षण व अभ्यास महत्त्वाचा असतो.ध्येय हे मोठे ठेवले तर माणूस हिरो बनतो असे प्रतिपादन कोपरगाव तालुका ग्रामीण पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक धरमसिंग सुंदरडे यांनी केले.

कोपरगाव तालुक्यातील सोनेवाडी येथे इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणासाठी शुभेच्छा देताना ते बोलत होते. सातवीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ व मुख्याध्यापकपदी नियुक्ती झाल्याबद्दल शाळेचे कृतिशील शिक्षक मनोहर वहाडणे व साई फायनान्स कंपनीचे संस्थापक




बाबासाहेब जगताप यांचा गौरव शाळेच्या वतीने करण्यात आला.

मनोहर वहाडणे व बाबासाहेब जगताप यांनी शाळेप्रती आदर युक्त भावना व्यक्त करत जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत दर्जेदार शिक्षण मिळते. मराठी शाळेचा विद्यार्थी कुठेच कमी पडत नाही. असे त्यांनी सांगितले. आपल्या लाडक्या शिक्षकाला निरोप देताना विद्यार्थी भाऊक झाले होते. विद्यार्थ्यांचे प्रेम पाहून मुख्याध्यापक मनोहर वहाडणे यांचे डोळे देखील ओले चिंब झाले होते.यावेळी सरपंच शकुंतलाताई गुडघे, सरपंच संजय गुडघे, मुख्याध्यापक महेंद्र रहाणे, पोलीस पाटील दगू गुडघे ,धर्मा जावळे,निरंजन गुडघे,किशोर जावळे, आबासाहेब जावळे,चिलु जावळे,कर्णा जावळे, बबलु जावळे उपस्थित होते. चंद्रविलास गव्हाणे, किशोर जावळे यांनी मनोगत व्यक्त केले.सुत्रसंचालन कु निकीता माळी व संचिका मिंड यांनी केले तर आभार विलास गवळी यांनी मानले.

## जागतिक हायरॉक्स स्पर्धेत साक्षी छाजेडची दमदार कामगिरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नगर :** शारीरिक ताकद, सहनशक्ती आणि मानसिक धैर्याची कठोर परीक्षा पाहणाऱ्या जागतिक हायरॉक्स स्पर्धेत नगरच्या साक्षी मनोज छाजेड हिने उल्लेखनीय कामगिरी करत आपली छाप पाडली आहे. बंगळुरू येथे पार पडलेल्या या स्पर्धेत सुमारे ८ हजार खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

हायरॉक्स ही जागतिक स्तरावरील हायब्रिड एंड्युरन्स स्पर्धा असून धावणे आणि फंक्शनल फिटनेस यांचा संगम यात पाहायला मिळतो. या स्पर्धेत ८ किलोमीटर धावण्यासोबत प्रत्येक किलोमीटरनंतर वेगवेगळ्या कठीण वर्कआउट टप्प्यांचा समावेश होता. यामध्ये स्किअर्ग, स्लेड पुश (१०२ किलो), स्लेड पुल (७८ किलो), बर्पी ब्रॉड जंप्स, रोविंग, फार्मर्स कॅरी, सॅण्ड बॅग लंजेस आणि वॉल बॉल्स अशा आव्हानात्मक प्रकारांचा समावेश होता. या सर्व कठीण टप्प्यांवर मात करत साक्षी छाजेड हिने उत्कृष्ट कामगिरी केली. तिच्या या यशामुळे क्रीडाप्रेमींमध्ये तिचे कौतुक होत आहे. साक्षी ही स्काय ब्रिजचे संचालक मनोज छाजेड यांची कन्या असून तिच्या यशामुळे नगरच्या नावाला नवे बळ मिळाले आहे.तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## ठेवीदारांचे पैसे गायब; साई सेवा पतसंस्थेविरोधात उपोषणाचा बिगुल

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** तालुक्यातील साई सेवा ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेतील ठेवीदारांचे कोट्यवधी रुपये अडकून पडल्याने परिस्थिती आता टोकाला पोहोचली आहे. संस्थेकडून दिलेल्या आश्वासनांचा भंग झाल्यामुळे संतप्त ठेवीदारांनी १५ एप्रिल २०२६ पासून तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे.

श्रीगोंदा तालुक्यातील साई सेवा ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेने १० एप्रिलपर्यंत सर्व ठेवी परत देण्याचे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, मुदत संपूनही ठेवीदारांना पैसे मिळालेले नाहीत.ठेवीदारांना कागदावर तारीख, पण खात्यात शून्य अशीच सध्याची वस्तुस्थिती आहे.या प्रकरणात संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याबाबत चर्चा झाली असली तरी प्रत्यक्षात कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही.

यामुळे सामान्य नागरिक अडचणीत सापडले आहेत या प्रकरणातील अनेक ठेवीदार हे सर्वसामान्य व ज्येष्ठ नागरिक असून, त्यांची आयुष्यभराची बचत अडकली आहे. त्यामुळे त्यांच्या दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम झाला आहे.ही केवळ आर्थिक अडचण नाही, तर ठेवीदारांच्या विश्वासाला बसलेला मोठा धक्का आहे.आता प्रशासन वेळीच कारवाई करते की परिस्थिती अधिक चिघळते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यामुळे ठेवीदारांमध्ये प्रचंड नाराजी आहे. ठेवीदारांनी सहाय्यक निबंधक व पोलीस प्रशासनाकडे निवेदनं देऊन न्याय मागितला.

मात्र, अद्याप कोणताही ठोस निर्णय न झाल्याने न्याय मिळणार तरी कधी? असा सवाल उपस्थित होत आहे. त्यामुळे ठेवीदारांनी स्पष्ट शब्दांत उपोषणाचा इशारा इशारा दिला आहेठेवी परत मिळेपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही.तसेच आंदोलनादरम्यान कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्याची जबाबदारी प्रशासनावर राहील, असेही साईसेवा बचाव कृती समितीने दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनात अनेक मान्यवरांच्या सह्या आहेत.

**सहाय्यक निबंधक यांच्याही शब्दाला हरताळ ?**

श्रीगोंदा सहाय्यक निबंधक नारायण परजणे यांनीही ठेवीदारांना व्हिडिओ कॉन्फरन्स डरे माहिती दिली होती की १० एप्रिल पासून ठेवीदारांच्या पैशाचे वाटप केले जाईल मात्र साई सेवा पतसंस्थेने त्यांच्याही शब्दाला हरताळ फासला असून आता नेमकी कोणती कारवाई होते याकडे सगळ्यांचे लक्ष लागून राहिले आहे सदर उपोषण शांततेत व कायदेशीर मार्गाने करण्यात येणार असून, सर्व ठेवीदारांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

**या प्रमुख मागण्या....**

१) भारतीय दंड संहिता कलम ४२०, ४०६, बीएनएस ४०९ अंतर्गत तात्काळ एफआयआर नोंदवावा. २) ठेवीदारांचे अडकलेले पैसे तात्काळ परत द्यावेत.३) संबंधित संचालकांवर कठोर कारवाई करावी. ४) कर्तव्यात कसूर करणाऱ्या प्रशासकीय अधिकाऱ्यांवर चौकशी करून कारवाई करावी.

## कुकडीच्या नियोजनाचा बोजवारा उडाल्याने श्रीगोंद्याचा शेतकरी आक्रमक

### सूर्य ओकतोय आग : अपुऱ्या आवर्तनामुळे पिके धोक्यात; पाणीपट्टी माफ करण्याची लिंपणगावच्या शेतकऱ्यांची मागणी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** संपूर्ण राज्यात उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली असून, श्रीगोंदा तालुक्यात सकाळी नऊपासूनच सूर्य आग ओकू लागला आहे. या वाढत्या उष्णतेमुळे जनजीवन विस्कळीत झाले असून, मजुरांनीही शेतात येणे बंद केले आहे. अशातच घोड आणि कुकडी लाभक्षेत्रातील पाण्याचे मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होत असल्याने उन्हाळी पिके, फळबागा आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. मात्र, सिंचन विभागाच्या उदासीन धोरणामुळे ''पाणी उशाला आणि कोरड घशाला'' अशी स्थिती श्रीगोंद्यातील शेतकऱ्यांची झाली आहे.

कुकडी लाभक्षेत्रात करमाळा ते इतर तालुक्यांना पाणी वाटप करताना नेहमीच शेवटच्या (टेलच्या) शेतकऱ्यांवर अन्याय होतो. लिंपणगाव येथील १३२ मायनर कालव्यावर पूर्वी २५० क्युसेकने पाणी सोडले जायचे, मात्र आता हे प्रमाण ८० ते ९० क्युसेकपर्यंत खाली आले आहे. मुबलक मनुष्यबळ आणि मशिनरी असूनही पूर्ण दाबाने पाणी का सोडले जात नाही, असा संतप्त सवाल शेतकरी विचारत आहेत. उन्हाळी हंगामाचे दुसरे आवर्तन केवळ चाऱ्या ओल्या करण्यापुरतेच मर्यादित राहिल्याने शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट आहे.

शेतकरी पाणी वापर संस्थेने रीतसर मागणी (डिमांड) नोंदवूनही कुकडीच्या अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. पिकांना पाणी मिळाले नाही, मात्र शेतकऱ्यांच्या माथी प्रचंड पाणीपट्टीचा भार टाकण्यात आला आहे. ही अन्यायी पाणीपट्टी तात्काळ रद्द करून माफ करावी, अशी मागणी लिंपणगावच्या लाभधारक शेतकऱ्यांनी निवेदनाडरे केली आहे.

**लोकप्रतिनिधींना जाब विचारणार**

ऐन उन्हाळ्यात हक्काचे पाणी मिळत नसल्याने शेतकऱ्यांचा पारा चढला आहे. या प्रश्नी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दुर्लक्ष केल्याचा आरोप होत असून, आता जनता दरबारात अधिकारी आणि लोकप्रतिनिधींना समोरासमोर बसवून जाब विचारण्याचा निर्धार शेतकऱ्यांनी केला आहे. योग्य तोडगा न निघाल्यास आक्रमक पवित्रा घेण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री

सोमवार, दि.१३ एप्रिल २०२६ । अहिल्यानगर । पान नं. ८

# 'देवऋषी'च्या आमिषाला बळी महिलेवर अत्याचार, लाखोंची फसवणूक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : पती-पत्नीतील मतभेद दूर करण्याचे आमिष दाखवत एका स्वयंघोषित 'देवऋषी'ने ४२ वर्षीय महिलेवर लैंगिक अत्याचार करून तब्बल ५० लाखांहून अधिक रक्कम उकळल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी स्वारगेट पोलिसांनी औदुंबर मनोहर गडदे (रा. तरटगाव, ता. पंढरपूर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. आरोपीने महिलेला लॉजवर बोलावून अत्याचार केल्याचा आरोप असून, नंतर विविध ठिकाणी वारंवार जबरदस्तीने संबंध ठेवले. तसेच नोकरी, गुंतवणूक व बंगला मिळवून देण्याचे आमिष दाखवत फसवणूक केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. महिलेच्या एकटेपणाचा गैरफायदा घेत आरोपीने दीर्घकाळ तिचा विश्वास संपादन केला. या प्रकरणाचा तपास पोलीस करत आहेत.

# सिस्पे फसवणूक प्रकरणातील दोषींना अटक करा

## पोलीस अधीक्षकांकडे मागणी : १६ एप्रिलपासून गुंतवणूकदारांचे आमरण उपोषण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सुपे** : सिस्पे इन्फिनिटी बीकन प्रकरणातील कथित आर्थिक गैरव्यवहार आणि गुंतवणूकदारांच्या फसवणुकीमुळे पारनेर तालुक्यातील वातावरण तापले आहे. दोषींवर कठोर कारवाई करून गुंतवणूकदारांचे पैसे परत मिळावेत, या मागणीसाठी बाबा आप्पा दरोडे, अनिल तरटे आणि गोवर्धन मगर (रा. म्हसणे) यांच्या नेतृत्वाखाली नागरिकांनी पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांना निवेदन दिले आहे.

प्रशासनाने १५ एप्रिलपर्यंत ठोस निर्णय न घेतल्यास १६ एप्रिल २०२६ पासून पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा या निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदनात नमूद केल्यानुसार, संबंधित कंपनीने सर्वसामान्य गुंतवणूकदारांची मोठी आर्थिक लूट केली आहे. तक्रारी करूनही



अद्याप अपेक्षित कारवाई झालेली नाही. उलट, काही आरोपी न्यायालयातून जामीन मिळवून पुन्हा सक्रिय झाले असून, त्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्याची मागणी गुंतवणूकदारांनी केली आहे. आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाने तपासादरम्यान जप्त केलेली रक्कम तात्काळ पीडितांना वितरित करावी, अशी प्रमुख मागणी आंदोलकांनी केली आहे. गुंतवणूकदारांनी आरोपींना तात्काळ अटक करण्याची आणि न्यायालयीन प्रक्रियेत सहभागी असणाऱ्या व्यक्तींना पोलीस संरक्षण देण्याची मागणी केली आहे.

आम्ही वारंवार पाठपुरावा करूनही प्रशासन केवळ आश्वासने देत आहे, त्यामुळे आता उपोषणाशिवाय पर्याय उरला नाही, अशी भावना गुंतवणूकदारांनी व्यक्त केली आहे. १६ एप्रिलपासून डीएसपी चौक येथे सुरू होणाऱ्या या उपोषणात मोठ्या संख्येने गुंतवणूकदार सहभागी होण्याची शक्यता आहे. या काळात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्यास प्रशासन जबाबदार राहील, असा इशाराही देण्यात आला आहे. या प्रकरणातील वाढत्या असंतोषामुळे आता पोलीस प्रशासन काय पावले उचलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जलजीवन मिशन अंतर्गत पाणी पुरवठा योजना निधीअभावी ठप्प

## योजना रखडल्याने रस्त्यांची कामेही खोळंबली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : जलजीवन प्राधिकरण व जिल्हा परिषदमार्फत प्रगतीपथावर असलेल्या 'पंतप्रधान जलजीवन मिशन' अंतर्गतच्या पाणी पुरवठा योजनांची कामे निधी अभावी ठप्प झाली आहेत. देयके थकल्याने संबंधित ठेकेदारांनी उर्वरीत कामे करण्यास असमर्थता दर्शविली आहे. थकीत देयके अदा केल्याशिवाय तसेच पुरेसा निधी उपलब्ध केल्याशिवाय ठेकेदार कामे करण्यास तयार नाहित. सदरच्या पाणी पुरवठा योजनांची कामे रखडल्याने गावातील अंतर्गत रस्त्यांची कामेही खोळंबली आहेत.

त्यामुळे शासनाने सदरच्या योजनांची कामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करावा अशी मागणी नगरपालिका, नगरपंचायती तसेच ग्रामपंचायतीच्या प्रशासनाकडून केली जात आहे. केन्द्र शासनाच्या 'पंतप्रधान जलजीवन मिशन'' या महत्वाकांक्षी योजने अंतर्गत पाणी पुरवठा योजनांची कामे सुरु आहेत.यातील बहुतांश योजनाची कामे सहा महिन्यांपासून निधी नसल्याने ठप्प झाली आहेत. केन्द्र शासनाने त्यांच्या निधीची रक्कम यापूर्वीच दिलेली आहे.मात्र राज्य शासनाच्या हिश्याची रक्कम प्रलंबित आहे. राज्य शासनाने केन्द्राकडे वाढिव निधीची मागणी केली असता केन्द्र शासनाने अतिरिक्त निधी देण्यास नकार दिल्याने राज्य शासनापुढे निधीची उपलब्धता करणेबाबत आर्थिक अडचणींमुळे पेच उभा ठाकला आहे. पाणी पुरवठा योजनांची कामे अर्धवट राहिल्याने शहर वा गाव अंतर्गतची रस्त्यांची कामे देखिल खोळंबली आहेत. रस्त्यांची कामे केली व पाणी पुरवठा योजनांची कामे पुन्हा सुरु झाली तर पाईप लाईन टाकणेसाठी रस्ते खोदावे लागतील. यामुळे रस्त्यांसाठीचा खर्च वाया जाण्याची शक्यता आहे.रस्त्यांची कामे सुरु करता येत नसल्याने स्थानिक प्रशासनाला हकनाक रोष पत्कारावा लागत आहे. या गंभीर प्रश्नाकडे शासनाने गांभिर्याने लक्ष घालून पुरेशा निधीची उपलब्धता करावी अशी मागणी केली जात आहे.

# शेती महामंडळाच्या जमिनी मोफत वाटप निर्णयास आळा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव** : महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या जमिनी मोफत वाटपाचा निर्णय रद्द झाल्याबद्दल कामगार मेळाव्यात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे अभिनंदन करण्यात आले. श्रीरामपूर येथील साखर कामगार हॉस्पिटल सभागृहात रविवारी झालेल्या भव्य मेळाव्यात राज्यातील १४ मळ्यांवरील कामगार व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मेळाव्यात उच्च न्यायालय संभाजीनगर व औद्योगिक न्यायालय अहिल्यानगर यांनी कामगारांच्या बाजूने दिलेल्या निर्णयांची माहिती देण्यात आली. घरभाडे व डिपॉझिट परत देणे, चौथा व सहावा वेतन आयोग लागू करणे तसेच रोजंदारी कामगारांना नुकसानभरपाई देण्याचे आदेश न्यायालयाने दिले असल्याचे सांगण्यात आले. कामगार लढा कृती समितीचे सरचिटणीस सुभाष कुलकर्णी यांनी कामगारांना थकीत वेतन तातडीने देण्याची मागणी केली. तसेच निवासासाठी दोन गुंठे जागा देण्याबाबतही पाठपुरावा सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ठराविक कालावधीत मागण्या पूर्ण न झाल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला. या मेळाव्यात भिकन शिंदे,भालचंद्र शिंदे,सागर मिसाळ,ऍडव्होकेट संजय चंदनशिवे,उत्तम राजगुडे,अशोक पाटील,सुधाकर चव्हाण,सुनील बनकर ,बाबासाहेब बोर्डे,भालचंद्र कोल्हटकर, आदींनी आपले मनोगत व कामगार समस्या मांडल्या. या प्रसंगी विविध कामगार नेत्यांनी मनोगत व्यक्त करत आगामी लढ्यासाठी कामगार सज्ज असल्याचे स्पष्ट केले.

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याजवळ अज्ञाताने दुचाकी पेटवली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : राहुरी फॅक्टरी येथे काल पहाटेच्या (दि. १२ एप्रिल) सुमारास नगर मनमाड रोडने कोल्हार कडून एक जोडपे दुचाकी वर येत होते. त्यांच्यात सुरुवातीला वाद चालू होता हळूहळू हा वाद मोठ्या प्रमाणात विकोपाला गेला. व त्या अज्ञात इसमाने मागचा पुढचा काही एक विचार न करता रागाच्या भरात आपली दुचाकी पेटवून दिली. पहाटेची वेळ असल्याने काही जागरूक नागरिकांनी त्या ठिकाणी येऊन ती मोटार सायकल विझविण्याचा प्रयत्न केला परंतु ती मोटार सायकल आगीने इतक्या मोठ्या प्रमाणात वेढली गेली होती की ती थोड्या वेळातच आगीत जळून भस्मसात झाली. झालेल्या या प्रकाराची चर्चा राहुरी फॅक्टरीवर सर्वत्र होत आहे. दरम्यान या घटनेची पोलिसात कुठेही तक्रार नसल्याचे समजत आहे. मात्र आपलीच दुचाकी पेटवून देणारा इसम कोण ? याचा अजून कुणालाही थांग पत्ता लागलेला नाही.

# तळेगावसह १६ गावांना लवकरच शुद्ध पाणीपुरवठा

## कोल्हेवाडी फाटा येथील अडथळा दूर; पाईपलाईन जोडणीचे काम वेगाने सुरू

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : तालुक्यातील निंबाळे शिवारात प्रवरा नदीवरून कोल्हेवाडी फाटा मार्गे वडगावपान साठवण तलावात पाणी सोडण्यासाठी सुरू असलेल्या पाईपलाईन जोडणीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. काही काळ कोल्हेवाडी फाटा येथे अडथळ्यांमुळे काम मंदावले होते.

मात्र हा अडथळा दूर करण्यात आल्याने सध्या काम युद्धपातळीवर सुरू असून पुढील १० ते १५ दिवसांत तळेगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेअंतर्गत १६ गावांना शुद्ध पाणीपुरवठा सुरू होणार आहे. तळेगाव प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेच्या अंमलबजावणीत कोल्हेवाडी फाटा येथे अडथळे निर्माण झाले होते. हे अडथळे दूर झाल्यानंतर प्रवरा नदीतील पाणी पाईपलाईनद्वारे वडगावपान साठवण तलावात सोडण्याचे काम सुरू आहे.

जलशुद्धीकरण प्रकल्पाद्वारे हे पाणी शुद्ध करून तळेगावसह १६ गावांना जलजीवन मिशनच्या माध्यमातून पुरवठा केला जाणार आहे. या योजनेतील जलशुद्धीकरण प्रकल्पासह बहुतांश काम पूर्ण झाले असून उर्वरित पाईपलाईन जोडणीचे काम अंतिम टप्प्यात आहे. हे काम येत्या १० ते १५ दिवसांत पूर्ण होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

> पाणीपुरवठा योजनेचे अध्यक्ष व काही सदस्य हे काँग्रेस पक्षाचे असून, वीज बिल थकीत राहिल्याने काही वेळा वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटनाही घडल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे काही गावांना नियमित पाणीपुरवठ्यात अडचणी आल्याची स्थानिकांची तक्रार आहे. जलजीवन मिशन अंतर्गत कामे सध्या वेगाने सुरू असली तरी त्याचे कंत्राटही काँग्रेसशी संबंधित ठेकेदाराकडे असल्याचा आरोपही महायुतीच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.
>
> तळेगाव दिघे गावासाठी स्वतंत्र पाणीपुरवठा व्यवस्था उभी करण्यात आली आहे. राज्याचे जलसंपदा तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि आमदार अमोल खताळ यांच्या माध्यमातून भागवतवाडी येथील तलावातून पाईपलाईनद्वारे पाणी उचलून ग्रामपंचायतीमार्फत तळेगावला पुरवठा सुरू करण्यात आला आहे. मात्र या कामाचे काहीजण खोटे श्रेय घेत आहेत.
>
> **मयूर दिघे (उपसरपंच, तळेगाव दिघे)**

# देवदैठणमध्ये वडिलांचा बुडून मृत्यू, मुलाचा थरारक बचाव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : तालुक्यातील देवदैठण येथे रविवारी (दि. १२ एप्रिल) सकाळी घडलेल्या हृदयद्रावक घटनेत एका वडिलांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला, तर त्यांच्या चिमुकल्या मुलाला जीवदान मिळाल्याने गावभर हळहळ आणि दिलासा अशा दोन्ही भावना एकाच वेळी उमटल्या. गावातील अमित रंगनाथ साठे (वय ४०) हे आपल्या ९ वर्षीय मुलगा साहील याला पोहायला शिकवण्यासाठी संत निमराज महाराज मंदिर व दधीची ऋषी मंदिराच्या मागील सिद्ध नदीवरील केटीमध्ये उतरले होते.

पण पाण्याचा अंदाज चुकला आणि क्षणात सगळं हाताबाहेर गेलं. पोहायला शिकवणारेच वडील पाण्याच्या विळख्यात सापडले. दरम्यान, साहील हाही बुडू लागला. वेळ आली तर देवही माणसाच्या रूपात



धावून येतो, हेच जणू सिद्ध करत त्या ठिकाणाहून जात असलेल्या सुधीर धोत्रे यांनी प्रसंगावधान दाखवत जीवाची पर्वा न करता पाण्यात उडी घेतली आणि साहीलला सुरक्षित बाहेर काढले. एका क्षणाचा निर्णय-आणि एका जीवाचा श्वास परत आला. दुसरीकडे, नवनाथ जाधव यांनी जवळपास अर्धा तास अमित साठे यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. पण पाण्याची खोली आणि दमछाक यामुळे शोधमोहीम थांबवावी लागली.

त्यानंतर ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी गर्दी केली. माहिती मिळताच बेलवंडी पोलिसांना कळविण्यात आले. रायगव्हाण येथील एकलव्य संघटनेच्या बचाव पथकाने घटनास्थळी दाखल होत शोधमोहीम राबवली आणि अखेर अमित साठे यांचा मृतदेह बाहेर काढण्यात आला.या बचाव कार्यात काळू निकम, करण माळी, राहुल गायकवाड, बन्नी जाधव, दादू गायकवाड यांनी मोलाची मदत केली.

तसेच दौलत नाना शितोळे यांची डिजास्टर रिस्क्यू फोर्स आणि रांजणगाव एमआयडीसीचे अग्निशामक दलही घटनास्थळी दाखल झाले होते.मृतदेह पुढील शवविच्छेदनासाठी शिरूर येथे पाठविण्यात आला असून, बेलवंडी पोलीस अधिक तपास करत आहेत.

> **एकाच वेळी शोक आणि समाधानाची भावना**
>
> एकीकडे वडिलांच्या मृत्यूने गाव सुन्न आणि शोकमग्न झाले तर दुसरीकडे मुलगा बचावला याचे समाधानही व्यक्त होत आहे. पाणी खेळ नाही, तो स्वभावानेच गूढ आणि कधी कधी निर्दयी असतो, ही जुनी म्हण पुन्हा खरी ठरली.

# मिशन वात्सल्य बैठकीस अधिकाऱ्यांची दांडी

## एकल महिलांविषयी असंवेदनशीलता उघड



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : एकल महिलांसाठी राज्य शासन स्वतंत्र धोरण आखण्याच्या तयारीत असताना, स्थानिक पातळीवर मात्र अधिकाऱ्यांची असंवेदनशीलता समोर आली आहे. श्रीरामपूर तालुका मिशन वात्सल्य शासकीय समितीच्या बैठकीस अनेक विभागांच्या अधिकाऱ्यांनी गैरहजेरी लावल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली. तहसीलदार मिलिंदकुमार वाघ यांच्या अनुपस्थितीत नायब तहसीलदार डी. पी. शेकटकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली.

प्रभारी बालविकास प्रकल्पाधिकारी शोभा शिंदे, अशासकीय सदस्य मिलिंदकुमार साळवे, बाळासाहेब जपे, तालुका संरक्षण अधिकारी दीपाली भिसे, पोलीस उपनिरीक्षक गणेश जाधव व नगरपालिकेच्या प्रतिनिधी वर्षा पाठक उपस्थित होत्या. मात्र गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, तालुका विधी सेवा प्राधिकरण, समाजकल्याण विभाग, कृषी अधिकारी, पुरवठा विभाग व 'उमेद' अभियान प्रतिनिधी यांनी बैठकीस दांडी मारली. सलग दोन बैठकींना अधिकाऱ्यांची अनुपस्थिती राहिल्याने सदस्यांनी तीव्र नाराजी व्यक्त करत कारणे दाखवा नोटीस देण्याची मागणी केली. यावर शेकटकर यांनी तहसीलदारांशी चर्चा करून पुढील कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. दरम्यान, नगरपालिकेच्या हद्दीत एकल महिलांचे सर्वेक्षण सुरू असून आतापर्यंत ६८४ महिलांची नोंद झाली आहे. अपात्र शिधापत्रिकाधारकांची छाननी करून नव्या योजनेत एकल महिलांना प्राधान्य दिले जाणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली.

# पीएचडी करणाऱ्या विद्यार्थिनीची आत्महत्या; प्राध्यापकास अटक

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : बॉटनी विषयात पीएचडी करणाऱ्या एका विद्यार्थिनीने (३० वर्षे) आत्महत्या केली. धक्कादायक बाब म्हणजे या प्रकरणात बोटॅनिकल सर्व्हे ऑफ इंडियाचा प्राध्यापक असणाऱ्या सहाय्यक संचालक डॉ. ए. बिन्नियमिन (५० वर्षे) याला अटक करण्यात आली आहे. प्राध्यापकाने विद्यार्थिनीचा विनयभंग केला होता. त्याचा विद्यार्थिनीला मोठा धक्का बसला होता. यातच विद्यार्थिनीने धक्कादायक पाऊल उचलच स्वत:चा जीव घेतला.

आत्महत्या करणाऱ्या तीस वर्षीय विद्यार्थिनींच्या वडिलांनी याप्रकरणी भोसरी एमआयडीसी पोलीस ठाण्यामध्ये फिर्याद दिली आहे. पुण्यातील कोरेगाव पार्क परिसरातील ही घटना. येथील एका महाविद्यालयातील विद्यार्थिनीने शनिवारी ११ एप्रिल रोजी राहत्या घरी शाहूनगर येथे गळफास घेऊन आत्महत्या केली. संबंधित तरुणी बॉटनी या विषयात बोटॅनिकल सर्व्हे ऑफ इंडिया येथे पीएचडी करीत होती. तर आरोपी बिन्नियमिन तिचा गाईड होता. आत्महत्या करण्यापूर्वी संबंधित विद्यार्थिनीने चिठ्ठी लिहून ठेवली आहे. विद्यार्थिनीने चिठ्ठीमध्ये तिच्यासोबत घडलेला प्रकार सांगितला आहे. ऑगस्ट २०२५ पासून बिन्नियमिन हा अनैतिक प्रकार, गैरवर्तन आणि मानसिक त्रास देत होता. त्याच्या या त्रासाला कंटाळून तरुणीने आत्महत्या केली.

दरम्यान, आत्महत्या करण्यापूर्वी दोन दिवस आधी बिन्नियमिन याने स्टॅम्प पेपरवर पुन्हा असा प्रकार करणार नाही. चूक झाली असं लिहून दिलं होतं. परंतु, संबंधित तरुणी या मानसिक धक्क्यातून सावरली नव्हती. त्यामुळे तिने आत्महत्या करीत असल्याचे चिठ्ठीत लिहून ठेवले. बिन्नियमिन याला अटक केली असून त्याला बुधवार १५ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश कोर्टाने दिले आहेत. पोलीस निरीक्षक भोजराज मिसाळ तपास करीत आहेत.

# मोबाईलच्या नादात खानावळीत आग; मोठे आर्थिक नुकसान

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरातील मध्यवस्तीतील एका खानावळीत रविवारी दुपारी स्वयंपाक करताना भीषण आग लागून मोठे आर्थिक नुकसान झाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, दुपारच्या सुमारास जेवण बनवण्याचे काम सुरू असताना गॅसवरील कढईतील तेलाने अचानक पेट घेतला. त्यावेळी मुख्य आचारी मोबाईल पाहण्यात गुंतलेला असल्याने त्याचे आगीकडे वेळीच लक्ष गेले नाही. काही क्षणांतच आगीने रौद्र रूप धारण केले व धुराचे लोट बाहेर पडू लागले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी तत्काळ अग्निशमन दलाला पाचारण केले. अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग आटोक्यात आणली. मात्र तोपर्यंत खानावळीतील साहित्य व स्वयंपाकघराचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. प्राथमिक माहितीनुसार, मोबाईलच्या वापरामुळे लक्ष विचलित झाल्याने ही दुर्घटना घडल्याचे समोर येत आहे. अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी काम करताना सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# शेवगावातील दूध डेअरीवरील कारवाईनंतर गोंधळ

## अहवाल येण्याआधीच 'क्लीन चिट'मुळे संशयाची पालवी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगाव** : शेवगाव शहरातील एका दूध डेअरीवर अन्न व औषध प्रशासन विभागाने मंगळवार दि. ७ रोजी सायंकाळी छापा टाकला होता. या कारवाईत अन्न भेसळ विभागाच्या अपर्णा भोईटे व अन्नपुरवठा अधिकारी प्रदीप पवार सहभागी होते. कारवाईदरम्यान संबंधित डेअरीतून दूधाचे नमुने घेण्यात आले होते. व ते तपासण्यासाठी पाठवण्यात येणार असल्याची माहिती पवार यांनी दिली होती.

छाप्यानंतर प्रदीप पवार यांनी माध्यमांशी बोलताना नमुन्यांचा अहवाल एक महिन्याच्या कालावधीत येईल, असे स्पष्ट केले होते. मात्र, त्यानंतर अवघ्या दोन -तीन दिवसांत नगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत प्रदीप पवार



आणि अन्नसुरक्षा अधिकारी राजेश बडे यांनी माध्यमांना दिलेल्या प्रतिक्रियेत संबंधित डेअरीमध्ये भेसळीचा कोणताही संशयास्पद प्रकार आढळला नसल्याचे सांगितले. व ही नियमित तपासणी असल्याचे सांगितले. त्यामुळे शेवगावमध्ये या प्रकरणाबाबत मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, शेवगाव येथील मूळ कारवाईत सहभागी नसलेल्या राजेश बडे यांनी घाईघाईने संबंधित डेअरीला 'क्लीन चिट' देण्यासारखे वक्तव्य केल्याने अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

वरिष्ठ अधिकारी अपर्णा भोईटे उपस्थित असताना अशी भूमिका का घेतली गेली, याबाबत नागरिकांमध्ये शंका व्यक्त होत आहे. यामुळे अन्न भेसळ विभाग आणि डेअरी चालक यांच्यात संगनमत असल्याच्या चर्चा शनिवारी दिवसभर रंगल्या. या संदर्भात अपर्णा भोईटे व प्रदीप पवार यांना विचारले असता, प्रयोगशाळेचा अंतिम अहवाल येणे बाकी असून सध्या कोणतेही निष्कर्ष काढणे योग्य नाही. राजेश बडे यांनी दिलेल्या वक्तव्याशी आम्ही सहमत नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, पत्रकार परिषदेत बडेंसोबत उपस्थितीमुळे पवार यांच्याबाबतही संशय व्यक्त केला जात आहे.

परिणामी, या कारवाईतील अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर सर्वत्र प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ५० ते ६० हजार लोकसंख्या असलेल्या शेवगाव शहरातील नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित गंभीर प्रश्नावर अशा प्रकारे संभ्रम निर्माण होणे धोकादायक असल्याची प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी आता जोर धरू लागली असून काही सामाजिक संघटना यासाठी पुढाकार घेण्याच्या तयारीत असल्याची माहिती आहे.

> **पालकमंत्र्यांनी लक्ष घालावे**
>
> जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दूध भेसळ प्रकरणांवर कठोर कारवाईचे निर्देश दिलेले असतानाही अधिकाऱ्यांकडून परस्परविरोधी माहिती दिली जात असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. या प्रकरणात पालकमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने लक्ष घालावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

> **संशयित अधिकाऱ्यांच्या चौकशीची मागणी**
>
> या प्रकरणात लवकरच पालकमंत्री, जिल्हाधिकारी, अँटी करप्शन विभाग व मुख्यमंत्री सचिवालयाकडे निवेदन देण्यात येणार आहे. अन्न भेसळ विभागातील काही अधिकाऱ्यांचे दूध माफियांसोबत आर्थिक संबंध असल्याचा संशय असून त्याची सखोल चौकशी व्हावी. तसेच, संशयास्पद हालचाली करणाऱ्या एका अधिकाऱ्याच्या भूमिकेचीही चौकशी करण्याची मागणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.
>
> **प्रा शैलेंद्र जायभाये, अध्यक्ष जिल्हा माहिती अधिकार महासंघ अहिल्यानगर**